दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

SAMARTH RAJYOG

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -२४६ शुक्रवार,दि.०९ मे २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-246 Friday, Dt.09 May 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4


## भारताने पाकिस्तानच्या फेक नरेटिव्हचा बुरखा फाडला

नवी दिल्ली : वाढत्या भारत - पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवार आठ मे रोजी संध्याकाळी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानच्या फेक नरेटिव्हचा बुरखा फाडला.

पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २२ एप्रिल रोजी नागरिकांवर हल्ला केला. अतिरेक्यांनी २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाची हत्या केली. पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांच्या कारवाईत पाकिस्तानचा थेट हात असल्याचे पुरावे भारताच्या हाती आले आहेत. पाकिस्तानच्या कृत्यामुळेच २२ एप्रिल पासून भारत - पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढू लागल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले.

# पाकिस्तानला युद्धाची खुमखुमी

## जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, होशियारपूरवर पाकिस्तानचा ड्रोन हल्ला; भारताचाही प्रतिहल्ला; ड्रोन हवेतच नष्ट केले!



भारताने पाकिस्तानची ३ विमाने पाडली, जम्मूत दोन जेएफ १७ आणि राजस्थानमध्ये एक एफ १६ पाडले

नवी दिल्ली : 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानने बिथरून केलेल्या ड्रोन हल्ल्यांना भारताने कठोर प्रत्युत्तर दिले आहे. गुरुवारी रात्री जम्मू, पठाणकोट, जैसलमेर आणि पंजाबमधील होशियारपूरवर पाकिस्तानने ड्रोन हल्ले केले. यावेळी पाकिस्तानचे लक्ष जम्मू विमानतळ, रेल्वे स्टेशन आणि सीमावर्ती भाग होते. मात्र भारताची अत्याधुनिक S-४०० डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाली आणि अनेक ड्रोन हवेतच उडवण्यात आले.

भारतीय हवाई दलाची प्रभावी कारवाई - पाकिस्तानचे तीन विमाने पाडले

या हल्ल्यानंतर भारतीय हवाई दलाने प्रतिहल्ला करत जम्मूत दोन गक्र-१७ आणि राजस्थानमध्ये एक ऋ-१६ पाकिस्तानी लढाऊ विमानं पाडली. ही माहिती पाकिस्तानच्या लष्करानेही अखेर कबूल केली आहे.

हल्ल्यानंतर जम्मू, राजस्थानच्या सीमावर्ती भागांत ब्लॅकआउट करण्यात आला. सायरन वाजवून नागरिकांना सतर्क करण्यात आलं, आणि सैन्याने संपूर्ण परिसराचा ताबा घेतला. एस-४०० प्रणालीने पाकिस्तानचे अनेक ड्रोन हवेतच नष्ट केले.

सीमाभागात पाकिस्तानचा गोळीबार, भारताने लाहोरवर प्रत्युत्तर दिलं

गुरुवारी सकाळी पाकिस्तानने पुन्हा शस्त्रसंधीचं उल्लंघन करत गोळीबार केला आणि भारतातील १५ शहरांवर हल्ल्याचा प्रयत्न केला. त्याला प्रत्युत्तर देताना भारताने लाहोरमध्ये ड्रोन घुसवून पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टिम निष्क्रिय केली. यामुळे पाकिस्तानमध्ये भीतीचं आणि गोंधळाचं वातावरण पसरलं आहे.

## भारताने लाहोर-सियालकोटमध्ये केला हल्ला, पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त

नवी दिल्ली: ऑपरेशन सिंदूरमध्ये ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केल्यानंतर आणि ९०हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केल्यानंतर पाकिस्तान चवताळला आहे. पाकिस्तानकडून सातत्याने हल्ले सुरू आहेत. याला भारताकडूनही जोरदार प्रत्युत्तर दिले जात आहे. पाकिस्तानचे हल्ले परतवले जात आहेत.

भारताच्या काऊंटर अ‍ॅटॅकनंतर पाकिस्तानमध्ये भूकंप आला आहे. लाहोर, इस्लामाबाद, कराची आणि बहावलपूरमध्ये सायनर वाजले आहेत. पाकिस्तानला भारतीय लष्कराकडून दिल्या जात असलेल्या कारवाईदरम्यान भारतीय नौदलही कारवाईच्या तयारीत आले आहेत. भारतीय नौदलाचे पश्चिमी कमांड पाकिस्तानला उत्तर देण्यासाठी सामील करण्याची योजना बनवली जात आहे.



# सेवा जेष्ठता डावलून बडतर्फ झालेल्या कनिष्ठ अधिकाऱ्याकडे सीमा ओलांडून पदभार टाकला ?

## शिक्षण विभागाचा हे भगवान अर्थपूर्ण फुलारी कारभार !

बीड /प्रतिनिधी

शिक्षकांची सेवाजेष्ठता डावलून शिक्षण विस्तार अधिकारी झालेल्या आणि त्याच प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी बडतर्फ केलेल्या आष्टी येथील वादग्रस्त शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती सीमा टकले यांना दि. ७ मे रोजी आष्टीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार दिला आहे. जिल्हा परिषदेच्या या आदेशामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून जिल्हा परिषदेत काहीही होऊ शकते, याचा प्रत्यय या आदेशाने आला आहे. सेवाजेष्ठता डावलून कनिष्ठ असलेल्या व्यक्तीकडे सदर पदभार दिल्याने याप्रकरणी चौकशी करून आदेश रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात माहिती असे की, बीड जिल्हा परिषदेत विविध गैरव्यवहार प्रकरणी २०१२ मध्ये वादग्रस्त झालेले आणि निलंबित होऊन पदावनत झालेले मुख्य कार्यकारी अधिकारी राजीव जवळेकर यांनी आपल्या कार्यकाळात बीड जिल्हा परिषदेत अनेक बेकायदेशीर आणि चुकीचे आदेश काढले होते. जवळेकर यांच्याच काळात शिक्षण विभागामध्ये सेवाजेष्ठता डावलून १२ जणांना कनिष्ठ विस्तार अधिकारी आणि ८ शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी पदोन्नती देण्यात आली होती. मात्र यातील चार जणांनी न्यायालयात जाऊन दिशाभूल करून तात्पुरती स्थगिती मिळविली. या बोगस पदोन्नत्या संदर्भात शिक्षण विभागात सेवाजेष्ठ असलेल्या अनेकांनी तक्रारी केल्या. मात्र सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याच्या कारण देत आणि संगनमताने याप्रकरणी काही कारवाई झाली नाही. आयुक्त कार्यालय आणि राज्य कार्यालयाला ही चुकीचा अहवाल पाठवून उलट संबंधितांना वेतनवाढीचा लाभ देण्यात आला. बेकायदेशीर लाभ घेतलेल्या सीमा टकले यांना तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांच्या काळात बडतर्फ करण्यात आले मात्र याप्रकरणी त्यांनी न्यायालयात धाव घेऊन स्थगिती मिळवली होती. बारावी पास असलेल्या श्रीमती सीमा टकले यांनी शिक्षक म्हणून नोकरी मिळवली होती. तत्कालीन वादग्रस्त सीईओ राजीव जवळेकर यांच्या काळात त्या कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी झाल्या. अनेकांच्या तक्रारीमुळे सुनावणी घेऊन सीईओ अजित पवार यांनी त्यांना बडतर्फ केले. मात्र न्यायालयातून त्यांनी तात्पुरती स्थगिती मिळवली. जिल्हा परिषदेतील कर्मचारी, अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या न्यायालयाच्या पॅनलमध्ये वकील मॅनेज होत असल्यामुळे सदर प्रकरण अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. आष्टीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव हे नियत वयोमानानुसार दि. ३० रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. प्रभारी पदभार देण्यासाठी राजकीय पदाधिकाऱ्यांकडून अधिकाऱ्यावर दबाव वाढला. प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा श्रीमती टकले यांचा दि.७ रोजी आदेश निघाल्याने शिक्षण विभागाच्या आजब कारभाराची चर्चा होत आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची दिशाभूल

आष्टीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदी श्रीमती सीमा टकले यांच्या नियुक्तीची संचिका प्रास्तावित झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने यांना सेवाजेष्ठता यादीची सर्व कल्पना न देता अंधारात ठेवून नियुक्ती केल्याची तक्रार करण्यात आली आहे. पाटोदा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी पिकवणे हे राजपत्रित असुन त्यांना कार्यभार देण्या ऐवजी कनिष्ठ आणि वादग्रस्त अधिकाऱ्याला पदभार दिल्यामुळे उलटसुलट चर्चा होत आहे.

### सिईओ'साहेब विस्तार अधिकाऱ्याच्या कामाचा आढावा घ्या

गुणवत्ता वाढीसाठी शिक्षण विस्तार अधिकारी हे महत्त्वाचे पद आहे. गेल्या काही वर्षापासून प्रभारी गटशिक्षणाधिकारी आणि उपशिक्षणाधिकारी होण्यात काही जण धन्यता मानतात. काहींनी आपले खाजगी संस्था, उद्योग व्यवसाय सुरू केले आहेत. पुढाऱ्याला चिटकून असलेल्या काही जणांमुळे तर शिक्षणाधिकारी आणि सीईओ आपले काही करू शकत नाहीत अशी भावना बळावत चालली आहे. कामचुकारपणा करणाऱ्यांना पाय बंद घालण्याची मागणी करण्यात आली आहे.

# पवनचक्की कंपन्यांविरोधात पाचेगावात शेतकरी आक्रमक

## विद्युत तारा ओढण्यासाठी विरोध केल्याने तणाव निर्माण झाला होता

बीड /शेतातून विद्युत तारा ओढणाऱ्या पवनचक्की कंपन्यांच्या विरोधात पाटोदा तालुक्यातील पाचेगावमध्ये बुधवारी (७ मे) शेतकरी आक्रमक झाले होते. या वेळी पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. विरोध करणाऱ्या एका शेतकऱ्याला पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

पाटोदा तालुक्यात पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असून शेतकऱ्यांना मावेजा न देणे, धनादेश न वटणे आणि दडपशाही करणे असे प्रकार सर्रास सुरू आहेत. बुधवारी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकरी पवनचक्की कंपन्यांविरोधात आक्रमक झाले होते. शेतकऱ्यांचा विरोध झुगारून विद्युत तारा ओढणाऱ्या पवनचक्की कंपन्यांना विरोध केल्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते. पाटोद्याचे पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके व पोलिस प्रशासन आणि अतिरिक्त कुमक व दोन पोलिसांच्या व्हॅन घटनास्थळी दाखल होत्या. तारा ओढण्यास विरोध करणाऱ्या व जबरदस्तीने तारा ओढल्यास जिवाचे बरेवाईट करून घेईन असे म्हणणाऱ्या अक्षय बाळासाहेब मुळे या शेतकरीपुत्राला पोलिसांनी पकडून व्हॅनमध्ये टाकून पाटोदा पोलिस स्टेशनला नेले. पाचेगावच्या पीडित शेतकऱ्यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक (बीड) तसेच उपविभागीय अधिकारी (पाटोदा), तहसीलदार (पाटोदा) आणि पोलिस स्टेशन (पाटोदा) यांना मावेजा देईपर्यंत तारा ओढण्याचे काम बंद ठेवून न्याय देण्याची मागणी केली.


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5



झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था केज संचलित
जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय केज ता. केज जि. बीड

पाहिजेत

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित व झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था केज संचलित जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय केज येथे कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य, सहा. प्राध्यापक, शा.शि. संचालक, ग्रंथपाल ही पूर्णवळ पदे भरावयाची आहेत. तरी पात्र उमेदवारांनी आपले अर्ज शैक्षणिक पात्रतेच्या छायांकित प्रतीसह जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसांचे आत टपालाने किंवा प्रत्यक्ष सचिव झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था केज संचलित, जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय केज ता. केज जि. बीड 431123 या ठिकाणी सादर करावेत.

| अं.क्र | पदनाम | विषय | रिक्तपदे | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | प्राचार्य | | १ | अराखीव-१ |
| २. | ग्रंथपाल | | १ | अनु जाती-०२ |
| ३. | सहा.प्राध्यापक | शा.शि.संचालक | १ | अनु जमाती-०१ |
| ४. | सहा.प्राध्यापक | रसायनशास्त्र | ५ | विजा.अ.-०१ |
| ५. | सहा.प्राध्यापक | भौतिकशास्त्र | २ | भज ब -०१ |
| ६. | सहा.प्राध्यापक | वनस्पतीशास्त्र | ३ | भज क -०१ |
| ७. | सहा.प्राध्यापक | प्राणिशास्त्र | ३ | भज ड -०१ |
| ८. | सहा.प्राध्यापक | गणित | २ | इमाव-०४ |
| ९. | सहा.प्राध्यापक | संगणकशास्त्र | २ | आदुघ-०२ |
| १०. | सहा.प्राध्यापक | सुक्ष्मजीवशास्त्र | २ | अराखीव-०८ |

अटी व शर्तीः- 1) प्राचार्य पदाची शैक्षणिक पात्रता विद्यापीठ आयोग नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर यांचे नियमानुसार राहील. 2) सहायक प्राध्यापकांसाठी शैक्षणिक पात्रता युजीसी, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन निर्णय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिपत्रकानुसार (NET/SET/Ph.D) लागू राहील. 3) मागासवर्गीय अर्जदारांनी संस्थेचे अध्यक्ष यांना सादर केलेल्या अर्जाची एक प्रत उपकुलसचिव, विशेष कक्ष, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना पाठवावी. 4) शा. नि.क्र. संकीर्ण 1096/प्र.क्र.30/ का-2 दि.01 ऑगस्ट 1997 प्रमाणे महिलांसाठी 30% आरक्षण राहिल 5) शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग 2018/प्र.36/14/16-3, मंत्रालय, मुंबई दिनांकः 28 मे 2019 प्रमाणे दिव्यांगासाठी 4% आरक्षण राहील 6) शा. नि.क्र. एन.जी. सी. 1298 (4619) / युनी-4 दि. 11 डिसेंबर 1999 प्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती साठी पदव्युत्तर पदवीसाठी 55% गुणांची अट शिथिल करून 50% करण्यात आलेली आहे. 7) आरक्षण अधिनियम-2001 (2004) प्रमाणे विजा-अ, भज-ब, व भज-ड अंतर्गत परिवर्तनीय आहे. ४) एआयसीटी / एनसीटीई अधिपत्याखालील संस्था / महाविद्यालयांनी त्यांच्या नियमानुसार कार्यवाही करावी. १) शा.नि.क्र. युएसजी 2008 / (21) / विशि-4, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32 दि. 14 नोव्हेंबर 2003 प्रमाणे दिव्यांग उमदेवाराबाबत पदव्युत्तर पदवीसाठी 65% गुणांची अट शिथिल करून 50% करण्यात आलेली आहे. 10) अराखीव पदांसाठी मागासवर्गीय उमेदवारांना अर्ज करता येईल, अनारक्षित पदे गुणवत्तेनुसार भरण्यात यावीत, 11) शासन निर्णय दिनांक 03 एप्रिल 2018 व 04 डिसेंबर 2018 नुसार अनाथांसाठी 1% आरक्षण राहील. 12) खुल्या प्रवर्गातील एकुण जागेपैकी 10% जागा आर्थिक दृष्ट्या मागास उमदेवारांना असतील. 13) उमेदवारांनी मुलाखती दिवशी मुळ कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित रहावे.

दि.०६/०५/२०२५

सचिव
झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, केज

# विष्णुबाळ झोडगे गरजवंतांचा सेवेकरी





बीड /प्रतिनिधी

गेली नऊ वर्ष आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमाने गोरगरीब, अनाथ, वृद्धाश्रमामध्ये साजरा करून त्यातच आनंद शोधणारा समाजसेवक म्हणजेच विष्णू झोडगे होय...

जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।। तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।। मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ।। ज्यासि अपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयी ।। दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।। तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ।। या संत तुकारामांच्या ओळीप्रमाणे

जे काही समाजामध्ये रंजले गांजले आहेत त्यांना आपलंसं करून त्यांना आपुलकीने आपलेपणाची जाणीव करून देणे याच एकमेव उद्दिष्टावर काम करणारे..खेडेगावातील पुसरा येथील सामाजिक कार्याची आवड अगदी तंतोतंत जपणारे,गरिबीच्या झळा खाऊन गरिबी आणि पडल्या नडल्याची रंजल्या गांजल्याची परिस्थितीची जाणीव ठेवून आपल्या सामाजिक कार्य करण्याच्या उद्दिष्टावर अगदी कुठल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता समाजकार्यात अगदी कमी वयात नाव कमावलेले पुसरा तालुका वडवणी येथील युवा सामाजिक कार्यकर्ते,तथा राजकीय,शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रात आपल्या छोट्याशा कामाची चुणुक दाखवणारे विष्णूबाळ दत्तात्रय झोडगे हे नाव काही तुम्हा आम्हा साठी नवीन नाही..!

हजारो मित्रमंडळीचा मेळा, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सहकार्याने सामाजिक कामाची आवड तसेच आडल्या-नढल्यांच्या वैद्यकीय क्षेत्रात समाधानकारक काम करून कुठलीही अपेक्षा न ठेवता शासकीय रुग्णालय तसेच प्रायव्हेट दवाखाने व इतर ठिकाणी आलेल्या रुग्णांची या सामाजिक कार्य कर्त्याला थोडीशीही माहिती झाली अथवा पुढचा पिढीत अडचणीत आहे उदाहरणार्थ जेवणाचा प्रॉब्लेम राहण्याचा प्रॉब्लेम रक्त हॉस्पिटलमधील काही अडचण असल्यास या उदार मनाच्या व्यक्तीला समजल्यास विष्णू बाळ झोडगे जातीने तिचे हजर राहून रुग्णालयात व इतर ठिकाणी येणारे अडचणीला पर्याय काढून समोरच्या व्यक्तीचे समाधान करण्यात मग्न असतात यातच त्यांना आनंद मिळतो असे त्यांचे मत आहे..!

सामाजिक राजकीय वैद्यकीय क्षेत्रात काम करत असताना कुठल्याही जाती धर्माच्या पंथाच्या कुठल्याही गावच्या व्यक्तीला अडचण आहे असे त्यांच्या कानावर किंवा फोनवर आल्यास त्यांची तगमग सदैव असते..

आपल्या प्रत्येक वाढदिवसा दिवशी सामाजिक उपक्रम म्हणून इनफट इंडिया, पसायदान प्रकल्प, जिव्हाळा बेघर अनाथांचा प्रकल्प, तसेच इतर प्रकल्पामध्ये गेल्या नऊ वर्षांपासून सामाजिक उपक्रमाला हातभार म्हणून आपल्या स्वतःच्या वाढदिवसा इतर खर्चाला फाटा देत गोरगरीब नकोशा असलेल्या माणसांच्या तोंडात एक सुखाचा घास दावा आणि त्याचं निमित्त आपण असावं.. या उद्देशाने सामाजिक उपक्रमामध्ये अगदी आघाडीवर नाव म्हणजे सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते विष्णूबाळ झोडगे...

महापुरुषांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिरे घेऊन शासकीय रक्तपेठ्यामध्ये रक्त उपलब्ध करून देण्यात तसेच रंजले गांजले पिढी त्यांना रक्त मिळवण्यासाठी सदैव प्रयत्नशील असणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांना बीड जिल्ह्यामध्ये नावलौक कि आहे..

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त एक आगळा वेगळा कार्यक्रम बाबासाहेबांना वंदन करण्यासाठी येणारे लाखो अनुयायी हार फुल तुरे तसेच मेणबत्त्या या खर्चावर जास्त भर न देता गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना एक वही एक पेन असा उपक्रम राबवून त्यातून अनेक गरजू विद्यार्थ्यांना वही पेन पोच करण्यात या सामाजिक कार्यकर्त्याचा हातखंडा आहे..!

अशा या सामाजिक राजकीय वैद्यकीय क्षेत्रात मदतीची भूमिका आणि गरजवंतांचा कैवारी म्हणून नावारूपाला आलेल्या सामाजिक कार्यकर्ता तथा युवा नेता विष्णूबाळ झोडगे यांना वाढदिवसानिमित्त अनेक उत्तर शुभेच्छा...

शब्दांकन..!
विष्णूबाळ झोडगे मित्रपरिवार, बीड
समदीप सामाजिक प्रतिष्ठान, बीड
महाराजा मित्र मंडळ बीड

## संपादकीय

# 'ऑपरेशन सिंदूर' ; पिक्चर अभी बाकी है...

काश्मीरमध्ये पहलगाम येथे निसर्ग सौदर्यांचा आनंद लुटण्यासाठी गेलेल्या ज्या २६ पर्यटकांना दहशतवाद्यांनी त्यांचा धर्म विचारून थेट गोळ्या घातल्या. त्याचा बदला भारतीय सैन्य दलाने 'ऑपरेशन सिंदूर'चा जबरदस्त प्रहार करून घेतला. दि. २२ एप्रिलच्या पहलगाम हत्याकांडाने सर्व देशाला हादरा बसला. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने तब्बल पंधरा दिवसांनी पाकिस्तानमध्ये घुसून पाकिस्तान व पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील सात शहरांतील नऊ दहशतवादी तळ अवघ्या पंचवीस मिनिटांत उद्ध्वस्त केले. ६ आणि ७ मेच्या मध्यरात्रीनंतर भारतीय हवाई दलाने दहशतवाद्यांच्या तळांवर हल्ले केले. क्षेपणास्त्रांनीही अचूक वेध घेतला आणि पाकिस्तानची दाणादाण उडाली. भारतीय सैन्यदलाकडून हल्ला होणार याची पूर्ण कल्पना पाकिस्तानला होती. भारत कसा व केव्हा हल्ला करणार, हल्ल्याचे टार्गेट काय असणार याबद्दल भारताने शेवटपर्यंत गुप्तता पाळली होती, पण ७ मे रोजी भल्या सकाळी भारतीय विमानांच्या पाकिस्तानवरील हल्ल्याची दृश्ये टीव्हीच्या पडद्यावर दिसू लागली तेव्हा देशात आनंदाची लाट उसळली. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यामातून दहशतवाद्यांचे नऊ मोठे तळ नेस्तनाबूत केल्याचे बघून काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र जनतेने सैन्यदलाचा जयजयकार केला. सोशल मीडियावर तर भारत माता की जय, मोदीजींचे अभिनंदन अशा पोस्टचा वर्षाव होत होता. मोदींसारखे कणखर नेतृत्व देशाला लाभले म्हणूनच भारत पाकिस्तानला धडा शिकवू शकला अशी भावना देशभर निर्माण झाली. जे लोकांना पाहिजे तेच मोदी करून दाखवतील असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटले होते. पहलगाम हत्याकांडातील दहशतवाद्यांना 'चुन चुन कर मार देंगे' असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले होते. पहलगामची घटना घडल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून भारतात परतले. ते काश्मीरला गेले नाहीत म्हणून विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी त्यांच्यावर टीकाही केली. पण बिहारमध्ये मधुबनी येथे बोलताना मोदी म्हणाले, 'दहशतवाद्यांनी कल्पनाही केली नसेल अशी त्यांना कठोर शिक्षा मिळेल'. मोदींनी देशाला दिलेला शब्द खरा करून दाखवला. जो कोणी हिंदूना टार्गेट करील त्याची अवस्था काय होईल हे 'ऑपरेशन सिंदूर' ने सर्व जगाला दाखवून दिले.

भारताने पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील दशतवाद्यांचे नऊ तळ हे आपले टार्गेट ठरवले होते. पाकव्याप्त काश्मीरमधील मुझफ्फराबाद येथील लष्कराच्या प्रशिक्षण केंद्राला लक्ष्य केले. सोनमर्ग, गुलमर्ग व पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांनी येथे प्रशिक्षण घेतले. कोटली, भिंबर, सियालकोट, मुरीदके, भवालपूर येथे जिथे-जिथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते तेथे भारतीय हवाई दलाने हल्ले करून ती केंद्रे बेचिराख करून टाकली. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये २४ क्षेपणास्त्रे डागली. हे तर होणारच होते हे सर्व जगाला ठाऊक होते. देशाचे नेतृत्व मोदींकडे असताना पहलगाम हत्याकांडानंतर भारत शांत बसणार नाही हे जगाने ओळखले होते. पुलवामा हत्याकांड झाल्यानंतर भारताने सर्जिकल स्ट्राईक करून पाकिस्तानला धडा शिकवला होता पण त्यानंतरही पाकिस्तानने भारतावर दहशतवादी हल्ले चालूच ठेवले होते. म्हणूनच पाकिस्तानला जरब बसेल अशी अद्दल घडवणे जरूरीचे होते. भारतीय सेना दल व हवाई दल यांनी 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम संयुक्तपणे राबवली. भारतीय हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंह व लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी या दोन महिला अधिकाऱ्यांनी नवी दिल्लीत संयुक्त पत्रकार परिषद घेऊन 'ऑपरेशन सिंदूर'ची तपशीलवार माहिती जगाला दिली. जैश ए मोहमंद या दहशतवादी संघटनेचा प्रमुख मसुद अजहरच्या कुटुंबातील दहा जणांचा व त्याच्या निकटचे असलेल्या चार जणांचा भारतीय हवाई हल्ल्यात मृत्यू झाला याची कबुली त्याने स्वत:च दिली आहे. भारताच्या मोस्ट वॉन्टेड मसुद अजहरच्या कुटुंबातील मरण पावलेल्या त्या सर्वांच्या नावांची यादीही जाहीर झाली आहे.

# दावरवाडी येथील जयघोषात धम्म रॅली व भोजनदान ......!



कार्यक्रमासाठी शेकडो अनुयायांची उपस्थिती....!

पैठण /प्रतिनिधी

येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा परिसरातील नालंदा बौध्द विहारात बुधवार ( दि.७) सकाळी दहा वाजता बौद्ध भिक्खू पुज्यभदंन्त उत्तमधम्मसार व पुज्य भंन्ते शाक्क पुत्र राहुल यांच्या प्रमुख उपस्थितीत बौद्ध भिक्खूच्या उपस्थितीत धम्मश्रामनेर प्रवचन व भोजन दानाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी दहा वाजता ही रॅली दावरवाडी बस स्टॉप वर आंबेडकरवादी व धम्मचैतन्य ग्रुप यांच्या वतीने ६७ भीख्यु यांचें यावेळी स्वागत करण्यात आले रॅली आयोजन मध्ये पूर्ण रस्त्यावर रांगोळी फुलांचा वर्षाव करण्यात आला होता ह्या रॅलीमध्ये धम्मचैतन्य ग्रुपच्या उपासक उपाशीका हजर होत्या पुज्य भंन्ते शाक्कपुत्र राहुल यांनी उपस्थित बौद्ध अनुयायांना उपदेशीत केले.या धम्मश्रामनेर कार्यक्रमात एकुण (७०) भिख्खूंचा सहभाग होता.पुष्पांच्या बुध्दम शरणंम गच्छामीच्या जयघोषात धम्म रॅली काढण्यात आली.धम्मश्रामनेर कार्यक्रम यशस्वीतेसाठी जेतवन धम्म संस्कार केंद्र तेलवाडी व धम्म चैतन्य ग्रुप दावरवाडीचे अरुण बल्लाळ, सुरेश धोत्रे, प्रकाश निकाळजे,दिलीप पाईक, दावरवाडी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक इंगळे सरपंच डीडी जाधव प्रवीण खांडे नानासाहेब एडके उत्तमराव खांडे, कमलाकर एडके, सुनील इंगळे, नितीन खांडे विनोद खांडे सचिन मगरे विजय मगरे तात्याराव वाघवसे,गौतम हिवराळे, विष्णु दाभाडे, रितेश दाभाडे, संदीप दाभाडे,यश भोसले,प्रतीक धनबहादुर,शिलवान बोर्डे,करण देवकर,सार्थक केदारे,मयुर दाभाडे,शंतनु गायकवाड आदींनी विशेष परीश्रम घेतले.

छाया : दावरवाडी येथील नालंदा बौध्द विहारात धम्मश्रामनेर कार्यक्रमात बौद्ध अनुयायांना उपदेशीत करतांना पुज्यभदंत उत्तमधम्मसार,पुज्यभंन्ते शाक्यपुत्र राहुल. छाया : भगवान सोरमारे




# लिंबागणेश येथे ऑपरेशन सिंदूर विजयाचा जल्लोष

लिंबागणेश (प्रतिनिधी)

२२ एप्रिल जम्मू कश्मीर येथील पहलगाम या ठिकाणी पाक धार देण्यात दहशतवाद्यांनी २६ निष्पाप भारतीय पर्यटकांचे निर्गुण पणे हत्या केली होती. पहलगाम हल्ल्यातील पीडितांना न्याय देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय सैन्य दलांनी लढाऊ विमाने आणि ड्रोनद्वारे क्षेपणास्त्राचे हल्ले करण्यात आले.या कारवाईत जैश -ए- मोहम्मद, लष्कर -ए-तोयबा, हिजबुल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनांची युवकांची भरती,त्यांचे प्रशिक्षण, दहशतवाद्यांना भारतामध्ये घुसवण्यासाठी लॉन्चिंग पॅडम्हणून वापरात येत असलेल्या काश्मीरमधील ५ आणि पाकिस्तान मधील ४ अशा एकुण ९ तळ जे गेल्या ३ दशकांपासून भारत विरोधी दहशतवादी कारवायांचे केंद्र राहिलेले आहेत. याठिकाणी हल्ले करून दहशतवादी अड्डे उद्धस्त करून पहलगाम येथील हल्ल्याचा बदला घेतला आहे.दहशतवादी अड्डे उद्धस्त करणा-या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत कारवाई केलेल्या भारतीय सेना आणि भारतीय सरकारचा आम्हाला सार्थ अभिमान असुन आम्ही एकजुटीने पाठिशी असुन भारतीय परंपरेत कुंकुहे सौभाग्याचं लेणं मानलं जाते.पहलगाम हल्ल्यात काही नवविवाहित युवकांनी जीव गमावला.त्यांच्या विधवा पत्नींचे शोकाकुल चेहरे पाहून संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली होती. त्यामुळे ऑपरेशन सिंदूर मोहिमेची माहिती जगाला देणा-या दोन रणरागिनी भारत सरकारने पत्रकार परिषदेत माहिती दिली.यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्यासह लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि वायुदलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग याची माहिती देण्यासाठी निवड करत भारताच्या लेकी अतिरेक्यांना ठोस प्रतिउत्तर देऊ शकतात हा संदेश देण्यात आला. आज दि.८ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील मुख्य प्रवेशद्वारावर भारतीय सैन्य आणि भारत सरकारचे अभिनंदन करत भारत माता की जय,जय हिंद, भारतीय सेना जिंदाबाद,वंदे मातरम आदी घोषणाबाजी करत आतषबाजी करत विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव,भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे,माजी सरपंच कल्याण वाणी, विक्रांत वाणी,भगवान मोरे, दामोदर थोरात, विक्रम दाभाडे ,गणपत तागड,संतोष भोसले, सुदाम मुळे,अँड.गणेश वाणी, संजय घोलप,पांडुरंग वाणी, दादा गायकवाड,राजेभाऊ ढास, संजय सुकाळे, नितीन जाधव, शिवाजी शिंदे, शिवाजी रणखांब, बाजीराव दशमे, हरिओम क्षीरसागर आणि राम फाळके उपस्थित होते.

# हंडा मोर्च्याला कादरी फाऊंडेशनचा पाठिंबा सर्वानी उपस्थित रहावे- शहेबाज कदरी

बीड /प्रतिनिधी

सध्या तीव्र उन्हामुळे उन्हाची तीव्रता वाढली असून बीड शहर व परिसरात बीड नगरपरिषद च्या हलगर्जी पणा मुळे मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत आहे नागरिकांना पाण्यासाठी वन वन फिरावे लागत असल्याने आज शुक्रवार दिनांक ९ मे २०२५ रोजीच्या हंडा मोर्च्यास काद्री फाउंडेशनचा पाठिंबा असून शरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात शामिल व्हावे असे आव्हान काद्री फाउंडेशन शहेबाज काद्री यांनी केले आहे.

# श्याम कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल लागला शंभर टक्के

बीड (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली श्याम कनिष्ठ महाविद्यालयाचा एच एस सी परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे निकालात मुलींनी बाजी मारली याविषयी सविस्तर माहिती अशी की या महाविद्यालयाची स्थापना शिक्षण महर्षी , कर्मयोगी शामरावजी गदळे गुरुजी यांनी केली तेव्हापासून ते आज तयागत या महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढतच आहे संस्थेचे सचिव श्री शरद गदळे यांचे निरनिराळ्या मीटिंगमधील मार्गदर्शन, प्राध्यापकांचे अध्यापन आणि विद्यार्थ्यांची जिद्द आणि मेहनत या सर्वांचा परिपाक आणि परिणाम म्हणजे बारावीचा लागलेला शंभर टक्के निकाल यावर्षी सर्वच परीक्षार्थी उत्तीर्ण झालेले आहेत या निकालात मुलींनी बाजी मारली यामध्ये कुमारी शिंदे सृष्टी शरद



९३ टक्के गुण घेऊन प्रथम आलेले आहे कुमारी नागरगोजे श्वेता रामदास ९२.६७% गुण घेऊन द्वितीय आली आहे, कुमारी आंधळे पायल ज्ञानोबा ९१ .३३% गुण घेऊन तृतीय आली तसेच कला शाखेत कुमारी जगताप अर्चना ८२ टक्के गुण घेऊन प्रथम आली, कुमार वाघमारे सागर रवींद्र ८१ टक्के गुण घेऊन द्वितीय आला व ढाकणे सुनील नामदेव याने ७९ टक्के गुण घेऊन तृतीय येण्याचा मान पटकावला आहे या व सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे



सचिव श्री शरद शामराव गदळे, अध्यक्ष डॉक्टर शशिकांत शामराव दहिफळकर, कोषाध्यक्ष डॉक्टर शालिनीताई कराड, प्राचार्या सौ जयश्री शरद गदळे, उपप्राचार्य राजेश गंधगे, शाम विद्यालय व महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व पालक यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत अशी माहिती प्रसार माध्यमांना श्री तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली आहे

# बारावीच्या परीक्षेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा नेत्रदीपक निकाल

माजलगाव (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या निकाल जाहीर झाला असुन सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने नेत्रदीपक निकाल लागला परंपरा आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ९७.२९%,कला शाखेचा ६७.१७ % वाणिज्य शाखेचा ९२.९४ %, व्यावसायिक अभ्यासक्रम ६६.२९% निकाल लागला आहे.बारावीच्या परीक्षेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम अनुप शरद नायबळ(९०.६७%),द्वितीय दिग्विजय सुरेश झरेकर(८९.८३%),तृतीय रोहन संदीप मुंदडा व ओजस्वीनी सचिन रुद्रवार (८७.५०%)कला शाखातुन प्रथम राणी माणिकराव भडके (८१.५०%), द्वितीय योगिता दत्तात्रय बोचरे (७७.६७%),तृतीय शुभांगी कारभारी राऊत (७६.३२%) वाणिज्य शाखाः प्रथम अंजली प्रल्हाद कुरे (८७.५०%), द्वितीय धनश्री उद्धवराव शेजुळ (८६.१७%), तृतीय पायल सचिन राऊत व धनश्री शंकर कोळपे (८१%) तर व्यावसायिक अभ्यासक्रमः प्रथम ऋतुजा मधुकर कापसे(७५.५०%),द्वितीय साक्षी सुदाम पौळ (७२.३३%), तृतीय पूजा महादेव रावले (७०.६७%) यांनी यश संपादन केले.बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह विकास समिती सदस्य अॅड.भानुदासराव डक,माजी आ.राधाकृष्ण होके पाटील, सत्यप्रकाश रुद्रवार,डॉ. बळीराम चव्हाण,प्राचार्य डॉ.जी.के.सानप,उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवन शिंदे,पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे,प्रा.स्वप्निल टाक, प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधिक्षक सतीश एरंडे यांनी अभिनंदन केले.

# साईबाबा जुनिअर कॉलेज बदनापूर चा १२ वी चा निकाल १००%

बदनापुर (प्रतिनिधी)

साईबाबा ज्युनियर कॉलेज च्या शै.वर्ष २०२४-२५ बॅच चा इयत्ता १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.यंदाच्या बारावीच्या परीक्षेत साईबाबा ज्युनियर कॉलेज येथून एकूण १६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते व सर्व विदयार्थी चांगले गुण घेऊन पास झाले आहेत. त्यातून कु . शुभांगी चंद्रकांत पवार या विद्यार्थिनीने ७३.३०% गुण प्राप्त करत आपले नाव प्रथम क्रमांकावर कोरले.

तर अनिकेत केदारनाथ गिते याने ६९% गुण संपादन करून व्दितीय क्रमांक मिळवला असून कू. भारती सांगुळे व रिजवान युसुफ शेख यांनी ६६.६७% गुण मिळवून तृतीय स्थान पटकावले आहे .सर्व विद्यार्थ्यांना कायम पाठिंबा असणारे मार्गदर्शक व निवृत्त पोलीस अधिकारी मा.श्री बळीराम गिते,संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. गजानन गिते सर , तसेच संस्थेच्या सचिव व सौ. सुनिता ताई बळीराम गिते यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना त्यांच्या भावी उच्च शिक्षणासाठी व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अभिनव राठोड बारावी बोर्ड परीक्षेत महाविद्यालयात प्रथम

डॉ आशिष तिवारी/मंठा - येथील रेणुका कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थी अभिनव ओमप्रकाश राठोड याने बारावी बोर्ड परीक्षेत ७६.८३% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे.यापूर्वी दहावी बोर्ड परीक्षेत त्याने ९४.४०% गुण मिळवत मंठा



तालुक्यात तिसरा क्रमांक मिळवला होता. तसेच पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतही तो शिष्यवृत्ती धारक ठरला होता.

तो स्वामी विवेकानंद विद्यालयाचे शिक्षक डॉ. ओ. बी. राठोड यांचा मुलगा असून, आपल्या यशाचे श्रेय त्याने महाविद्यालयातील शिक्षक, प्राचार्य आणि आपल्या पालकांना दिले आहे.

त्याच्या या यशाबद्दल रेणुका महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य मा. आमदार धोंडीराम राठोड, सचिव तथा आमदार राजेश राठोड, प्राचार्य ज्ञानेश्वर बुलबुले, उपप्राचार्य रंजित राठोड, प्रा. दिनेश शेजूळ, प्रा. प्रदीप देशमुख, प्रा. सुभाष शिलवंत, प्रा. आर. डी. जैन, प्रा. शिवाजी जाधव, प्रा. संजय गोर्डे, प्रा. सोनाजी कामीटे, तसेच मित्रपरिवारातील प्रा. डॉ. अशोक मुसळे आणि प्रा. गजानन कांगणे यांनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्र सायबरच्या चॅटबॉट व माहितीपटाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

## सायबर गुन्हे व फसवणूक टाळण्यासाठी अधिक परिणामकारपणे काम करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी । मुंबई

सायबर सुरक्षेसाठी देशातील अत्याधुनिक सुविधा महाराष्ट्रात आहेत. यामाध्यमातून सायबर गुन्हे, सायबर फसवणूक व मानवी तस्करीपासून लोकांना वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.या पुढील काळातही अधिक परिणामकारपणे काम करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सायबरच्या आर्टिफिशियल इंटिलिजन्स बॉट व सायबर जागरुकता माहितीपट या नाविन्यपूर्ण नागरिक केंद्रीत उपक्रमांचे अनावरण सह्याद्री अतिथिगृहात करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सायबरचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव, पोलीस उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे, पोलीस अधीक्षक हेमराजसिंग राजपूत, अभिनेता शरद केळकर, अभिनेत्री अमिषा पटेल, मुख्यमंत्री कार्यालयाचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी सायबर सुरक्षा विषयक माहितीपट दाखविण्यात आला. मराठी आणि हिंदी भाषेत असलेल्या या माहितीपटात अभिनेते शरद केळकर, अभिनेत्री अमिषा पटेल यांनी काम




केले आहे. या माध्यमातून सायबर गुन्हेगारी, सायबर फसवणूक संबंधी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र सायबरच्या कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅट बॉटचे सादरीकरण करण्यात आले. हा चॅटबॉट महाराष्ट्र सायबरच्या १९४५ या हेल्पलाईनशी जोडले गेले आहे. या चॅटबॉटमध्ये सायबर गुन्हे, तक्रार कशी करावी, यासंबंधीची माहिती मिळणार आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सायबर फसवणुकीसंबंधीचे कॉल्स मोठ्या प्रमाणात येत असतात. त्या सर्वांना उत्तर देणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कॉल्सना उत्तरे देणे व नागरिकांना माहिती मिळण्यासाठी चॅटबॉट व माहितीपट महत्त्वाचे ठरणार आहे. सायबर गुन्हे घडण्यापूर्वीच रोखण्यासाठी जनजागृती आवश्यक आहे. अशा कामात अभिनेते शरद केळकर व अभिनेत्री अमिषा पटेल यांच्यासारख्यांनी सहभाग घेतल्यामुळे नागरिकांपर्यंत चांगला संदेश जाईल.

नोकरीच्या निमित्ताने परदेशात नेऊन विक्री करण्यासारख्या घटना रोखण्यासाठीही यापुढील काळात जनजागृती करावी. मानवी तस्करीमध्ये लोकांना वाईट पद्धतीने वागविले जाते. त्यामुळे यासारखे अमानुष प्रकार बंद करण्यासाठी जनजागृती उपक्रम महाराष्ट्र सायबरने हाती घ्यावा, अशी सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.

अभिनेते श्री. केळकर म्हणाले की, सायबर गुन्हे व सायबर सुरक्षा विषयक जनजागृती करणे आवश्यक आहे. या उपक्रमात सहभागी झाल्याचा आनंद असून यामाध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती होईल. महाराष्ट्र सायबरने सुरू केलेला सायबर सुरक्षाविषयक हेल्पलाईन क्रमांक सध्याच्या काळात उपयुक्त आहे. श्रीमती पटेल म्हणाल्या की, डिजिटायझेशनच्या या युगात सायबर गुन्हेगारीच्या घटनांना आळा घालणे आवश्यक आहे. त्यासाठी लोकांमध्ये जागृती महत्त्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्र सायबरने घेतलेला जनजागृतीचा उपक्रम आजच्या काळात महत्त्वाचे आहे. मानवी तस्करीतून सुटका झालेल्या तरुणाने मानले महाराष्ट्र सायबरचे आभार महाराष्ट्र सायबरने नुकतेच नोकरीच्या निमित्ताने म्यानमार व लाओस या देशांमध्ये गुलाम म्हणून विकल्या गेलेल्या ६४ जणांना सुखरूप सोडवून आणले आहे तसेच पाच एजंटनाही अटक केली. मानवी तस्करीतून सुटका झालेल्या एका तरुणाने यावेळी त्याच्यावर आलेल्या प्रसंगाची माहिती दिली व महाराष्ट्र सायबरने वेळीच केलेल्या कारवाईमुळे सुटका झाल्याचे समाधान व्यक्त केले. या मोहिमेची माहिती पोलीस अधीक्षक श्री. राजपूत यांनी दिली.

यावेळी श्री. धवसे यांनी महाराष्ट्र सायबरच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अतिरिक्त पोलीस महासंचालक श्री. यादव यांनी जनजागृती उपक्रमाची माहिती दिली.




## चांगतपुरी ग्रामपंचायत मध्ये स्वातंत्र्यापासून अनुसूचित जाती जमाती आरक्षण नाही....!

पैठण /प्रतिनिधी

तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत चांगतपुरी येथे स्वातंत्र्यापासून सर्वसाधारण पुरुष,अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आरक्षण आज पर्यंत निघाले नाही चांगतपुरी ग्रामपंचायत अंतर्गत घारी,महमदपुर, इस्माईलपुर नारकरवाडी,दत्तनगर हि गावे असून चार महसुली गावे आहेत, अनुसूचित जाती जमाती लोकसंख्या जवळपास २० टक्के असून नेहमी आरक्षण इतर मागासवर्गीय प्रवर्ग (जइउ)असेच निघते. यावेळी खुला अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील मतदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.थेट जनतेतून निवड असलेल्या तालुक्यातील ११० ग्राम पंचायतीचे आरक्षण सोडत दिनांक १५ एप्रिल रोजी संपन्न झाले, अनुसूचित जाती साठी १६,अनुसूचित जमातीसाठी ३ ओबीसी प्रवर्गासाठी २९ तर खुल्या प्रवर्गासाठी ६२ जागा आरक्षित करण्यात आल्या.

आरक्षण सोडत विरूध्द तालुक्यात अनेकांच्या तक्रारी आल्या आहेत,ग्राम पंचायत स्थापनेपासून आजपर्यंत चांगतपुरी ग्रामपंचायत मध्ये अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व सर्वसाधारण पुरुष या जागा आज तोपर्यंत आरक्षित झाल्या नाहीत अशी तक्रार गावकऱ्यांच्या वतीने विभागीय आयुक्त व तहसीलदार यांना करून, चांगतपुरी ग्राम पंचायत मध्ये नेहमी होत असलेल्या ओबीसी आरक्षणात बदल करून तो अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती किंवा सर्वसाधारण पुरुष असे करून या घटकांना न्याय द्यावा अशी मागणी केली आहे.



बीड येथील आमचे नातेवाईक श्री. विकास स्वामी, येळंबकर यांची कन्या व पत्रकार श्री. वैभव स्वामी यांची पुतणी चि. सौ. कां.शिरीषा हिचा शुभविवाह औरंगाबाद येथील चिरंजीव सौरभ यांच्याशी बीड येथील सूर्या मंगल कार्यालयात अतिशय थाटामाटात पार पडला. यावेळी उपस्थित राहून वधू-वरांना शुभेच्छा देताना इचलकरंजीच्या मा.नगराध्यक्ष ॲड. सौ.अलका स्वामी, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोकराव स्वामी. यावेळी अनेक नेते, शासकीय अधिकारी, पत्रकार व नातेवाईक उपस्थित होते.

# सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर 'आयटीआयच्या' हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

## प्रत्येक नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन आणि बचावाचे धडे घेतले पाहिजेत

मुंबई : जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम इथे दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवर सध्या तणावाचे वातावरण आहे. पार्श्वभूमीवर कौशल्य विभाग आणि अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते ठाणे येथील राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. राज्यातल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ऑनलाईन द्वारे आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळा होणार आहेत.

या कार्यक्रमात कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक असो, याचे व्यवस्थापन आणि बचाव कसा करावा, याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकांनी घेतले पाहिजे. मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही त्यानुसार बदलले असून बचावाचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा आमचा उद्देश असल्याचे श्री. लोढा म्हणाले. त्याचबरोबर या कार्यक्रमात मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आयटी आयमध्ये सहा नव्या अभ्यासक्रमाची यावेळी घोषणा केली. यात कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), ई व्ही इलेक्ट्रिक वाहन व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स आणि थ्री डी प्रिंटिंग, ड्रोन तंत्रज्ञान, सोलर टेक्निशियन या अभ्यासक्रमांचा यात समावेश असून येत्या शैक्षणिक वर्षापासूनच याची सुरुवात होणार आहे.

दोन दिवसीय शिबिरात अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुनील मंत्री यांचे विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन लाभले. तर राज्याचे माजी पोलीस महासंचालक श्री. प्रवीण दीक्षित यांनी राज्यातील आयटीआय विद्यार्थ्यांची नागरी संरक्षण या विषयावर



ऑनलाईन कार्यशाळा घेतली.राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतल्या शिबिराच्या सुरुवातीला डॉ. लीना गडकरी यांनी आपत्ती व्यवस्थापन संकल्पना नेमकी काय हे विद्यार्थ्यांना सांगितले. या दोन दिवसीय शिबिरात बचाव आणि मदतकार्य याचे प्रशिक्षण ही देण्यात येणार आहे. मानव निर्मित आपत्ती यात युद्धाचा समावेश असून त्या काळात घ्यायची काळजी, उपचार आणि बचाव यावरही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत बचावाची प्रात्यक्षिके विद्यार्थिनींनी सादर केली. राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य श्रीमती. एस. एस. माने यांनी यावेळी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.


### टी सी हरवला आहे...

रमेश राजाराम कदम यांच्या १२ वी पासचा टिसी पाटोदा ते बीड प्रवासा दरम्यान हरवला आहे.

सापडल्यास संपर्क मोबाईल नंबर

९७३०६६३७३७





माजलगाव:- येथील केशवराज मंगल कार्यालयात सौ.अनिता उत्तमराव जोगदंड, मुख्याध्यापिका पुरुषोत्तमपुरी यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळा निमित्य प्रमुखपाहुणे म्हणुन शुभेच्छा देताना आयु.गयाबाई आवाड (माजी सभापती समाज कल्याण,जि. प. बीड)माजी नगराध्यक्ष तथा आरपीआय ता.अध्यक्ष अविनाश जावळे,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कचरू खळगे व इतर.


### जाहीरनामा

**मा.श्रीमती ए.बी. निवारे ९ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७१२ / २०२५ कोमल वि. निरंक**

**विधीज्ञ-श्री. जी. व्ही. काळे**

**मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः
(१) कोमल भ्र. शरद दुबाले, वय - ३१ वर्षे, धंदा घरकाम.
रा. लिंबारुई (देवी) ता. जि. बीड
(२) इंदुमती भ्र. बाबासाहेब दुबाले, वय - ७५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. लिंबारुई (देवी) ता. जि. बीड
३) बाबासाहेब पि. हरिभाऊ दुबाले, वय ७६ वर्षे, धंदा - काही नाही.
रा. लिंबारुई (देवी) ता. जि. बीड
विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे शरद पि. बाबासाहेब दुबाले राहणार लिंबारुई देवी ता. जि.बीड हे दिनांक ०२/०३/२०२५ रोजी राहते सरकारी दवाखाना, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र.१ ही मयत नामे शरद पि. बाबासाहेब दुबाले, यांची पत्नी, अर्जदार क्र. २ आई व अर्जदार क. ३ हे वडील आहेत.

मयत नामे शरद पि. बाबासाहेब दुबाले यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत शरद पि. बाबासाहेब दुबाले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख २४/०६/२०२५ आहे.

आज दिनांक ३०/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**स्वाक्षरित**
**क.लिपीक**

शिक्का

**आदेशावरून**
**स्वाक्षरित**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**



### चौकशीची जाहीर नोटीस

**धर्मादाय उप आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड विभाग, बीड**

बदल अर्ज क्रमांक - १६६३/२०२४ कलम- २२
सार्वजनिक न्यासाचे नाव :-
मातोश्री बहुउददेशीय सेवाभावी संस्था, एकुरका, ता. केज, जि. बीड.
व नोंदणी क्र- एफ- ८९२७/बीड
अर्जदार :- श्री हरीदास विष्णुदास केदार, मु. पो. एकुरका, ता. केज, जि. बीड.
सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

धर्मादाय उप आयुक्त बीड विभाग, बीड हे वर नमुर केलेल्या बदल अर्ज यासंबंधी सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्दयांवर चौकशी करणार आहेत:-

१. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) स्थावर मिळकतः-

मौजे एकुरका, ता. केज, जि. बीड येथील सर्व्हे नं. ३८/१/आ मधील ०० हे. ३४ आर. पैकी ०० हे. २२ आर जमीन खरेदी खत क्रमांक २५४७ आधारे दिनांक १४/०७/२००३ रोजी संस्थेने खरेदी केलेली आहे. ज्याची चर्तुसिमा खालीलप्रमाणे आहेत.
(१) पुर्वेसः विनायक रामचंद्र धस (२) दक्षिणेस: आश्रुबा मारुती केदार
(३) पश्चिमेस : रस्ता व रामहारी धस (४) उत्तरेस : गोपीनाथ येडु केदार

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने स्वतः किंवा विधीज्ञा मार्फत पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त बीड विभाग, बीड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०२/०५/२०२५ रोजी दिली.

**स्वाक्षरित**
**(एस.पी.सपकाळ)**
**वरिष्ठ लिपीक**

शिक्का

**आदेशावरून**
**अधीक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बीड विभाग,बीड**



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,जालना
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, जालना, सर्व्हे क्रमांक ४८८,,
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,,
जालना, जालना, जालना
दि.२६/०३/२५

### चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: JLN/00681/1860/25
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक ३०२/२५ क्र.१९

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक विद्यावीर बहूउद्देशीय सेवाभावी संस्था एच न ८३ कोर्ट रोड अंबड ता अंबड जि जालना बाबत ।

न्यासाचा पत्ता :- एच न ८३ कोर्ट रोड अंबड, टीक्यू अंबड, जालना, जालना, अंबड, अंबड

अर्जदार - श्रीकांत रघुनाथ वाळवे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, जालना, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मुल्य |
|---|---|---|
| १ | MEMBER FEES | ७०७.०० |

**(अ) जंगम मिळकत : रोख रू.७०७/मात्र (अक्षरी रूपये सातशे सात रूपये )**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सीएस किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्रमांक | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/ कालावधी किंवा स्वरूप | अंदाज मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|

**(ब) स्थावर मिळकत रोख रू/- मात्र**
**(अक्षरी रूपये मात्र फक्त)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २१-०३-२०२५ रोजी दिली ।

**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी**
**कार्यालय, जालना**

# सर्व विभागांनी ३१ मे पूर्वी पावसाळा पूर्वतयारी पूर्ण करावी - जिल्हाधिकारी जॉन्सन

प्रतिनिधी । बीड

सर्व विभागांनी त्यांच्या कक्षेत असलेल्या पावसाळापूर्व कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करावीत तसेच येणाऱ्या पावसाळ्यात नागरिकांसाठी शासन यंत्रणेची सज्जता ठेवून पावसामुळे हानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज दिले.




येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी सर्व विभागांनी करावयाच्या कामांचा आढावा जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी पूर्व तयारी बाबत माहिती दिली.

पावसाळा सुरू होताना जिल्ह्यात अनेक ठिकाणी वीज पडण्याच्या घटना होतात. गावपातळीवर पडणाऱ्या विजेपासून बचाव करण्याच्या उपायांबाबत जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. पातळीवर ग्रामसभामधून याबाबत माहिती देणे तसेच गावा-गावात जनजागृती पर संदेश लावणे, भिंतीपत्रके या माध्यमातून लोकांना माहिती देता येईल असे ते म्हणाले.

जिल्ह्यात ३०६ गावे नदी काठावर वसलेली आहेत तथापि गेवराई तालुक्यातील ३२, माजलगाव तालुक्यातील २६ आणि परळी वैद्यनाथ तालुक्यातील ५गावांना नदीच्या पुराचा धोका आहे. बीड शहरात देखील सन २००६ आणि सन २०१६ मध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती. या सर्व गावात आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत देण्यात आलेले बचाव साहित्य सुस्थितीत असल्याबाबत खात्री करून घ्यावी तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन याचे पूर्ण नियोजन करावे असे श्री जॉन्सन म्हणाले.

पुराचा धोका असलेल्या गावांमध्ये पुरेसा अन्नसाठा असणे आवश्यक आहे तसेच पावसामुळे पसरू शकतील अशा आजारांवरील औषधे देखील ग्रामीण रुग्णालय स्तरावर असतील याची खात्री करावी. पावसाळ्यात साप चावण्याचे प्रकार घडू शकतात त्यामुळे ग्रामीण रुग्णालयात त्या संदर्भातील लस उपलब्ध करून ठेवा असे जिल्हाधिकारी म्हणाले.काही ठिकाणी अतिवृष्टी होऊन नुकसान होते अशा ठिकाणी आदेशाची वाट न बघता तालुक्यातील कृषी अधिकारी व तलाठी यांनी तात्काळ पंचनामे करावे असेही निर्देश जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी दिले. पावसात वीज पुरवठा सुरळीत राहील तसेच रस्त्यावरील वाहतूक उत्तम पद्धतीने सुरू राहील याची खबरदारी यांनी सांगितले.



## ऑपरेशन सिंदूरचा बीड शहरामध्ये अभाविपकडून जललोष

बीड (प्रतिनिधी)


भारतीय सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर केलेल्या हवाई हल्ल्याचे देशभरात जल्लोषात स्वागत केले जात आहे. या ऐतिहासिक कामगिरीचे औचित्य साधून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) बीड शाखेच्या वतीने राजीव गांधी चौक परिसरात येथे पेढे वाटप करून आनंदोत्सव साजरा केला.या वेळी प्रदेश सहमंत्री स्वप्निल बगाडे,शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रदेश सह मंत्री स्वप्निल बगाडे म्हणाले की, भारतीय लष्कराने फक्त दहशतवादावर विजय मिळवला नाही, तर देशातील नागरिकांच्या मनामध्ये आत्मविश्वासाची आणि सुरक्षिततेची भावना निर्माण केली आहे. हा दिवस आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा आहे.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

प्रतिनिधी । बीड



राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे उद्या शुक्रवार दि. ९ मे २०२५ रोजी बीड जिल्हयाच्या दौ-यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.सकाळी ११.१५ वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथून हेलीकॉप्टरने बीडकडे प्रयाण.सकाळी ११.४५ वाजता आदिनाथ शास्त्री महाराज तारकेश्वरगड येथील हेलीपॅड वर आगमन व मोटारीने तारेश्वरकडे प्रयाण.दुपारी १२.०० वाजता तारकेश्वरगडाचे संस्थापक श्री नारायण महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त उत्सवास उपस्थिती, स्थळ तारकेश्वरगड, जि. बीड दुपारी १२.४५ वाजता आदिनाथ शास्त्री महाराज तारकेश्वरगड येथील हेलीपॅडकडे प्रयाण व दुपारी १.०० वाजता हेलीकॉप्टरव्दारे पुणेकडे प्रयाण.



**जाफराबाद/प्रतिनिधी**

**जाफराबाद शहरातील न्यु हायस्कूल ची माजी विद्यार्थीनी कु.कल्याणी भालके हिची महापारेषण विभागात विद्युत सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के, सचिव.मा.राहुल भाऊ म्हस्के, शाळेचे मुख्याध्यापक श्री.मुरकुटे सर , पर्यवेक्षक श्री. शेवाळे सर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खुप खुप अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कु.कल्याणी एकनाथ भालके हिचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे . तसेच कु.कल्यानी ला फुलगुच्छरुपी आशिर्वाद अभिनंदन देतांना आईवडील...**

# शेतक-यांनी सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन

बीड (जि.मा.का.) विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगरला भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांशी तक्रारी या शेतरस्ते, पाणंदरस्ते वरील अतिक्रमणाबाबत असल्याचे निदर्शनास आल्याने या विषयाबाबत बीड जिल्ह्यातील सर्व सबंधित नागरिकांशी थेट संवाद साधण्याकरिता वेबिनारचे आयोजन करण्यात येऊन संबंधित नागरिकांसोबत संवाद साधण्यात आला.

त्यामधील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा सहभाग शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करून देण्याच्या अनुषंगाने मागणी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी मामलेदार मधील तरतुदी मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके तसेच मंत्री, (महसूल) महाराष्ट्र राज्य यांनी शेत रस्त्यावर अवलंबित असलेली प्रकरणी एका महिन्यात निकाली काढण्याबाबत निर्देशाच्या अनुषंगाने तालुक्यातील शेतरस्ते,पाणंद अतिक्रमणाबाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे असल्याने.

सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालय यांच्याकडील निर्देशानुसार जिल्ह्यातील तालुकास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड होऊन जलद गतीने प्रकरणाचा निपटारा व्हावा व सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळोवेळी लोक आदालतीचे आयोजन करण्यात येते.



त्याच धरतीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पंधरा दिवसातून एकदा एका ठिकाणी तहसील कार्यालयात आणि मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी 'सस्ती अदालत'या नावाने बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात 'सस्ती अदालत' हा उपक्रम राबविण्यासाठी महिन्यातील दुसरा व चौथा शुक्रवार या दिवशी राबविण्यात येणार आहे सबब शेतरस्ते,पांदण रस्तयाबाबत तक्रारी असलेल्या शेतक-यांनी या सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.



स्व.बाळासाहेब ठाकरे स्वच्छ बस स्थानक अभियान २०२५निमित्त सुहास कोळपकर (आगारप्रमुख),शैलेश जोशी (स्थानकप्रमुख),अझर सिद्दीकी, अमोल निर्मळ,अभिमान उजगरे, विकास कुलकर्णी,अन्सार शेख व इतर यामध्ये सहभागी झाले होते.

## कर्म हेच आपल्या सुख आणि दु:खाचे कारण आहे - हभप एकनाथ महाराज माने

# श्रीक्षेत्र वांगी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



दिंद्रुड (प्रतिनिधी)

कर्म हेच आपल्या जीवनातील दु:ख आणि सुख यांचे कारण आहे. कारण आपण जे काही करतो, त्याचा परिणाम आपल्या जीवनात दिसतो. चांगले कर्म हेच आपल्याला आत्म-विकास साधण्यास मदत करत असल्याचे प्रतिपादन हभप गुरुवर्य एकनाथ महाराज माने यांनी केले. कर्मच आपल्याला नैतिकतेचे पालन करण्यास आणि चांगले आचरण करण्यास प्रवृत्त करते असेही महाराज आपल्या काल्याच्या कीर्तनात म्हणाले.

माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र वांगी येथे संत नारायण बाबा यांच्या ६८ व्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थानचे अध्यक्ष हभप गुरुवर्य एकनाथ महाराज माने यांची काल्याची कीर्तन सेवा संपन्न झाली.

बहु बरा बहु बरा ।<br>
या सांगाते मिळे चारा ।।<br>
म्हणवुनी जिवेसाठी ।<br>
घेतली कान्होबाची पाठी ।।

या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर माने महाराजांनी निरूपण केले. माणसाच्या जीवनात असलेले कर्माचे महत्त्व सांगताना महाराज पुढे म्हणाले की, कर्म म्हणजे फक्त शारीरिक क्रिया नसून, विचारांचे आणि भावनांचेही परिणाम आहेत. कर्मानुसार, व्यक्तीचे जीवन आणि भविष्य बदलू शकते.

सत्कर्म केल्याने आपल्याला आपले कर्तव्य आणि जबाबदारी याचे भान येते. त्यामुळेच आपल्या जीवनात योग्य दिशा मिळते व आयुष्याला अर्थ प्राप्त होतो असेही महाराज म्हणाले.सप्ताहभरात काकडा, विष्णुसहस्त्रनाम, संत तुकाराम महाराज गाथा पारायण, हरिपाठ, संगीत भजन, भारुड आदी दैनिक कार्यक्रम पार पडले.हभप कान्होबा महाराज मोरे ( देहूकर), हभप उल्हास महाराज सूर्यवंशी आळंदी (देवाची), हभप देविदास महाराज म्हस्के नेवासा, हभप उमेश महाराज दशरथे, हभप विष्णु महाराज जगताप पैठण, हभप ज्ञानेश्वर महाराज पाटील (जळकेकर), हभप संदिपान महाराज शिंदे हासेगावकर आदी नामवंत व गुणिजन महाराजांची कीर्तनसेवा झाली. सबंध महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या श्रीक्षेत्र वांगी संस्थान येथे हभप. राधाकृष्ण गरड गुरुजी (संगीत विशारद), हभप उद्धव महाराज गरड, हभप रामेश्वर महाराज गरड (गुरुजी), हभप उत्तरेश्वर महाराज जाधव, हभप अविनाश महाराज गरड, हभप बालाजी महाराज मोहिते,हभप. राम महाराज गरड या नामवंत गायक मंडळींसह मृदंगमहर्षी अभिमन्यू आबा मुळे, हभप माणिक महाराज गरड, हभप भागवत महाराज चव्हाण, हभप गणेश महाराज माने या मृदंगाचार्यांनी आपली उपस्थिती लावून कीर्तनात संगीतसाथ केली. गणेश गटकळ व गणेश रासवे यांनी उत्कृष्ट निवेदन केले. सप्ताहभरात हजारो भाविक भक्तांनी या भक्तीमय कार्यक्रमाचा लाभ घेतला. सादोळा येथील विलासराव सोळंके यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.




# महाराष्ट्राची वित्तीय शिस्त आणि आर्थिक विकासातील योगदान कौतुकास्पद

प्रतिनिधी । मुंबई

महाराष्ट्राच्या वित्तीय शिस्तीचे आणि देशाच्या आर्थिक विकासात राज्याच्या भरीव योगदानाचे सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरविंद पनगढिया यांनी कौतुक केले. सह्याद्री अतिथीगृह येथे सोळाव्या वित्त आयोगाची बैठक झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरविंद पनगढिया, सदस्य डॉ. मनोज पांडा व डॉ. सौम्यकांती घोष यांचे स्वागत केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या वतीने आयोगासमोर निवेदन सादर केले. या निवेदनात आयोगाच्या कार्यसूचीनुसार राज्याच्या विविध मागण्या व सूचना मांडण्यात आल्या. महाराष्ट्र शासनाने केंद्र व राज्यांमधील विभागणी ४१ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची मागणी केली आहे. तसेच अधिभार (लर्शीशी) व उपकर हे मुख्य करांमध्ये समाविष्ट करावेत आणि केंद्र सरकारच्या करेतर उत्पन्नाचाही समावेश विभागणीच्या निधीत करावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी करण्यात आली आहे.

राज्याने क्षैतिज वाटपासाठी (कीळेपींरश्र ऊर्शींश्रींळेप) नवीन निकष सुचवले आहेत, ज्यामध्ये 'शाश्वत विकास व हरित ऊर्जा' आणि भारताच्या 'जीडीपी'मध्ये राज्यांचा वृद्धीमान योगदान' यांचा समावेश आहे. याशिवाय 'उत्पन्न अंतर निकष' (खपलोश ऊळीींरपलश उीळ-ींशीळर) ४५ टक्क्यांवरून ३७.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची विनंती करण्यात आली आहे.

विशेष अनुदानासाठी १,२८,२३१ कोटींची मागणी

राज्याने विशेष अनुदानांतर्गत मुंबई महानगर प्रदेशाच्या आर्थिक मास्टर प्लॅनची अंमलबजावणी, नदीजोड प्रकल्प, नवीन उच्च न्यायालय संकुल, कारागृह पायाभूत सुविधा, वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर वसतीगृहे आणि इको-टूरिझमसाठी एकूण १,२८,२३१ कोटींच्या निधीची मागणी केली आहे. तसेच राज्यासाठी महसूल तूट अनुदान (ठर्शींशपीश ऊशषळलळीं ॠीरपीं) सुद्धा शिफारस करण्याची विनंती आयोगाकडे करण्यात आली.

'एसडीआरएफ' व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी वाढीव निधीची मागणी

राज्याने आपत्ती निवारण निधी अंतर्गत एकूण तरतूद वाढवावी आणि केंद्र-राज्य वाटपाचा हिस्सा ७५:२५ वरून ९०:१० असा करावा, अशी मागणी केली.

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अनुदान ४.२३ टक्क्यांवरून ५ टक्के विभागणी निधीतून करावे तसेच राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार या अनुदानाचे वितरण करावे. शहरे व महानगरपालिकांसाठी सार्वजनिक बस वाहतूक व अग्निशमन सेवेसाठीही स्वतंत्र अनुदान द्यावे, अशी विनंती करण्यात आली.या बैठकीदरम्यान आयोगाने व्यापारी व उद्योग प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशीही चर्चा केली.



## विभागीय आयुक्तांचा दिव्यांगांच्या प्रलबिंत मागण्यांबाबत थेट संवाद

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर विभागातील दिव्यांग यांच्या प्रलबिंत अडचणी सोडविण्यासाठी संबंधित जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना करावी, दिव्यांगांच्या अडचणी सोडविण्याला सर्वोच्च प्राधान्य देत अडचणी तत्परतेने सोडवा, असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिले.

विभागीय आयुक्त श्री. दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून संवाद मराठवाड्याशी वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारमध्ये विभागीय आयुक्त श्री.दिलीप गावडे, यांनी विभागातील दिव्यांगांच्या अडचणी, मागण्या या विषयावर विभागातील दिव्यांगांशी थेट संवाद साधला. यावेळी उपायुक्त सुरेश बेदमुथा,सह आयुक्त देविदास टेकाळे, सहायक आयुक्त राजेंद्र अहिरे, राम लाहोटी आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यातील दिव्यांग यांनी त्यांच्या आजपर्यंत प्रलबिंत असलेल्या मागण्यांबाबत माहिती दिली. अर्थसंकल्पित निधी निश्चित केलेल्या विविध विभागातून आर्थिक वर्षात खर्च करावा. दिव्यांगांच्या असलेल्या विविध समस्या व त्या अनुषंगाने उपाययोजना, राज्य शासनाचे शासन निर्णय, कायदा व विभागीय तरतूदी, दिव्यांग यांच्या नोकरीतील विविध अडचणी सुटण्यास गती द्यावी, अशा सूचना विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी उपस्थित दिव्यांगाच्या जिल्हानिहाय समस्या जाणून घेतल्या. तसेच त्यांच्या समस्यांचे लवकरात लवकर सोडविण्यासाठी प्रशासन कटीबद्ध असल्याचे सांगितले.छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यातील निवासी उपजिल्हाधिकारी , उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन, नगर पालिका मुख्याधिकारी व विविध विभागांचे अधिकारी यांनी दिव्यांगासाठी करावयाच्या पाच टक्के निधीतून शासन निर्णयानुसार सामुहिक व वैयक्तिक स्वरूपाच्या योजना वर खर्च करावा. दिव्यांग कर्मचारी यांच्या चार टक्के आरक्षण, पदभरती व पदोन्नती बाबतीत योग्य ती कारवाई करावी, अशा सुचना विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी दिल्या.यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# रेल्वे स्थानकावर आढळला बॉम्बसदृश्य वस्तू-एकच धावपळ

## मॉक ड्रिल असल्याने सोडला सुटकेचा श्वास




**परळी / प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील महत्वाचे रेल्वे स्थानक असलेल्या परळी वैजनाथ रेल्वे स्टेशनवर रेल्वे सुरक्षा बल, रेल्वे पोलीस (जीआरपी), अग्निशमन विभाग परळी वैजनाथ व बॉम्ब नाशक पथक बीड यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि ८ रोजी मॉक ड्रिल (अनुभव सराव) करण्यात आला. या दरम्यान या दरम्यान आपात्कालीन परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता कशा पद्धतीने वर्तन करावे या बाबत जागृती आणि मार्गदर्शन करण्याचे आले.**

देशात उदभवलेल्या विदारक परिस्थितीत जिल्ह्यातील परळी शहर औष्णिक वीज निर्मिती केंद्र , प्रमुख ज्योतिर्लिंग व महत्वाचे रेल्वे स्थानक आदी कारणांनी हे एक महत्वाचे शहर असल्याने गुरुवार दि ८ रोजी रेल्वे विभाग, सुरक्षा विभाग, जिल्हा पोलीस दल, आरोग्य विभाग आदी विभागाकडून एकत्रितपणे रेल्वे स्थानक परिसरात मॉक ड्रिल (अनुभव सराव ) घेण्यात आला.या प्रसंगी बॉम्बसदृश वस्तू रेल्वे स्थानक परिसरात सापडल्याची कल्पित घटना दाखवण्यात आली. सदर बॅगची तपासणी करून बॉम्ब नाशक पथकाने ती सुरक्षितरित्या विल्हेवाट लावली.तसेच आवश्यक त्या सर्व प्राथमिक उपाययोजना याची महिती देण्यात आली.या सरावामध्ये रेल्वे सुरक्षा बलाचे पोलीस निरीक्षक एस. बी. कांबळे, पोलीस उपनिरीक्षक किशोर मलकुनाईक, जीआरपी पोलीसचे उपनिरीक्षक साबळे व इतर कर्मचारी, बीड येथील बॉम्ब नाशक पथकाचे वैद्य, सानप, चोरे, गोडशे आदीअधिकारी व कर्मचारी, नगर परिषदेच्या आपत्ती विभागाचे सुरक्षा अधिकारी गजानन खांबट, सुनील आदोडे आरोग्य विभागाचे आरोग्य विभागाचे डॉ.सरिता मुंडे, विजयमाला टाक आदी विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला.या मॉक ड्रिलमुळे रेल्वे स्थानकावर आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि समन्वयपूर्वक कारवाई कशी करावी याचे प्रशिक्षण मिळाले.

# उज्वल यशाची परंपरा कायम ;शाम ज्युनिअर कॉलेज,दहिफळ (वड) चा १००% निकाल



केज/प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या शामज्युनियर कॉलेज,दहिफळ (वड) ने यंदाही आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे.नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी च्या परीक्षेच्यानिकालात कॉलेजने १००% निकालाची घवघवीत कामगिरी केली आहे.या यशामागे विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकवृंदाचे समर्पित मार्गदर्शन आहे.विज्ञान,कला शाखे तील सर्वच विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून,अनेकांनी 'पहिल्या श्रेणीत' उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे.विज्ञान शाखेचा १००% निकाल लागला असुन कला शाखेचा ९६% निकाल लागला आहे पैकी विज्ञान शाखे तून कु.शिंदे सृष्टी शरद हिने ९३ % घेत प्रथम तर कु.नागरगोजे श्वेता रामदास हिने ९२% घेत द्वितीय व कु.आंधळे पायल ज्ञानोबा हिने ९१% घेत तृतीयक्रमांक मिळवला आहे.तसेच कला शाखेतून जगताप आर्यन दत्तात्रय याने ८२% घेत प्रथम तर वाघमारे सागर रविंद्र याने ८१% घेत व्दितीय व ढाकणे सुनीलनामदेव याने ७९% घेत तृतीय क्रमांक पटकावला आहे.या यशाबद्दल संस्थेचे सचिव इंजि. शरद गदळे,अध्यक्ष डॉ. शशिकांत दहिफळकर व कोषाध्यक्ष डॉ. शालीनी कराड (गदळे ) तसेच कॉलेजचे प्राचार्य श्रीम.जयश्री शरद गदळे (इप्पर)उपप्राचार्य गंदगे आर.व्हि.सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत प्राचार्य श्रीम. जयश्री शरद गदळे यांनी शिक्षकांचे अभिनंदन करताना सांगितले की,कॉलेजचे उद्दिष्ट गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याची दिशा देणे हेच आहे. गावकऱ्यांनीही या यशाचा आनंद व्यक्त करत कॉलेजच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पारदर्शक आणि स्वच्छ कारभार असलेली आमची ग्रामपंचायत - सरपंच आशा शिरसाठ

### स्वत:च्या आर्थिक हितापोटी ग्रामपंचायतीची बदनामी करण्याचा प्रयत्न

आष्टी (प्रतिनिधी)

ग्रामपंचायतीची मी महिला सरपंच असून माझे काम पारदर्शक आणि स्वच्छ कारभार असून सर्वाना विश्वासात घेऊन आजवर कामे करण्यात आली आहेत. काही विघ्न संतोषी लोक स्वतःच्या पोळीवर तुप ओढून आर्थिक फायदा साधून घेण्यासाठी ग्रामपंचायतीची बदनामी करत आहेत. विकासाचा लेखाजोखा आरश्या प्रमाणे ठेवला आहे. विनाकारण कोणी गरळ ओकण्याचा प्रयत्न करू नये. विकासकामाचा हिशोब व कामे आम्ही कधीही समोर दाखवू असे सरपंच आशा आण्णासाहेब शिरसाठ यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.



आष्टी तालुक्यातील आरणविहरा - तांगडखेल ग्रुप ग्रामपंचायत असून, या ग्रामपंचायत अंतर्गत गावात विविध निधी सोबतच अनेक ठिकाणी पदरमोड करून विकास कामे केली आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आली तसेच दलितवस्ती सुधार योजनेची कामे, रोजगार हमी योजनेचे कामे, पथदिवे, गाव अंतर्गत रस्ते, शाळेची संरक्षण भिंत, अनेक वर्षांपासून स्मशानभूमी नव्हती, तो प्रश्न मार्गी लावला आहे तसेच सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लावला, यासह अनेक कामे दर्जेदार केली आहेत. पण गावातील काही विघ्न संतोषी लोकांनी मी महिला सरपंच असल्याने स्वतःच्या आर्थिक फायदा व्हावा म्हणून बोगस केलेल्या कामाचे पैसे घरात जावेत. यासाठी ग्रामपंचायतीची व महिला सरपंच असल्याने बदनामी करत आहेत. समोरासमोर बसून विकास कामे, आलेला निधी, खर्च झालेला निधी आम्ही गावाला दाखवू, पण अशी बदनामी करण्याचा प्रयत्न करू नये, स्वच्छ व पारदर्शक कारभार ग्रामपंचायतीचा असल्याचे सरपंच आशा आण्णासाहेब शिरसाठ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# रुईनालकोलच्या महेश विद्यालयाचा १२ वी चा ९८ टक्के निकाल,निकालाची परंपरा कायम



यावर्षीही मुलांपेक्षा मुलीच सरस

आष्टी (प्रतिनिधी)

नुकत्याच जाहीर झालेल्या १२ वीच्या बोर्डाच्या निकालात शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रुईनालकोल च्या शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ च्या बॅच चा इयत्ता १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करण घवघवीत यश संपादन करुन उज्वल यशाबरोबर निकालाची परंपरा कायम राखत विज्ञान,कला या दोन्ही क्षेत्रात बाजी मारली आहे.

यंदाच्या बारावीच्या परीक्षेत कला शाखेचे ३८ तर विज्ञान शाखेचे ९७ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. विज्ञान शाखेचा ९७.३६ टक्के निकाल लागला असून यामध्ये प्रथम क्रमांक कनेरकर स्नेहा मच्छिंद्र - ९०.१७, द्वितीय जगताप वृषाली संजय कुमार - ८९.३३ तृतीय वाळके रोहन जयसिंग - ८९.१७ क्रमांकाने उत्तीर्ण झाले असून एकूण ९७ विद्यार्थ्यांपैकी ९६ विद्यार्थी उत्तीर्ण त्यामध्ये ६५ विद्यार्थी विशेष गुणवत्ता व ३१ प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. तर कला शाखेत प्रथम खिळे श्रुतीका सतीश - ७३.५० द्वितीय शिंदे प्रियंका पांडुरंग - ६६.८३ तृतीय अनभुले साक्षी धनंजय - ६६.५० गुण मिळवत स्थान पटकावले आहे. एकूण ३८ विद्यार्थ्यांपैकी ३७ विद्यार्थी उत्तीर्ण. त्यापैकी १५ विद्यार्थी विशेष प्राविण्य व २२ विद्यार्थी श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आजच्या या उत्तुंग यशाचे मानकरी असलेल्या विद्यार्थ्यांच्या भावी उच्च शिक्षणासाठी व उज्वल भविष्यासाठी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब, मा. डॉ. अजय दादा धोंडे, प्रशासकीय अधिकारी राऊत डी. बी. सर, शिवदास विधाते सर, दत्तात्रय गिलचे सर, माऊली बोडखे सर, संजय शेंडे सर, प्राचार्य उत्तम भुकन सर, डी. बी. काळे, एस. यु. तोडकर, जी. एम. परदेशी, बी. एल. कोकरे, डी. जी. शेलार, एस. डी. एकशिंगे, एम. व्ही. बोडखे, एन. के. शिंदे, जी. के. दळवी, टी. डी. काळे, एस. एस. काळे, एम. व्ही. नालकोल, पी. एम. गांजुरे, सतिष वाघुले, ए. डी. धोंडे, भारत नालकोल, ए. एस. गांजुरे, अर्चना बोडखे मॅडम, एस. टी. खिलारे, महेश गायकवाड, टी. ए. मासाळकर सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी महेश विद्यालय रुईनालकोल तसेच सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# भाजपा युवा नेते अक्षय मुंदडांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाईत १३ मे रोजी चला हवा येऊ द्या



अंबाजोगाई(प्रतिनिधी)

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते अक्षय मुंदडा यांचा १३ मे रोजी वाढदिवस असुन त्या निमित्ताने अंबाजोगाई शहरात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये चला हवा येऊ द्या आणि मराठी पाऊल पढते पुढे याचा समावेश असुन शहर तथा पंचक्रोशीतील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन पक्षाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी केले. दरम्यान कार्यक्रमाच्या पुर्व तयारीसाठी अक्षय बंगल्यावर कार्यकर्त्यांची बैठक होवुन विविध समित्या वाटप करण्यात आल्या.

हा भव्य कार्यक्रम शहरातील मध्यभागी असलेल्या सेंट अँन्थोनी स्कुलच्या मैदानावर घेतला जात असुन व्यवस्थेतील प्रमुख पदाधिकार्यांनी त्या दृष्टीने मैदानाची काल पहाणी करत रचना केली आहे. युवा नेते अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस तसं पहाता मोठ्या प्रमाणात साजरा करणे त्यांना स्वत:च मान्य नसते. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव यंदा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरवल्याचे गंभीरे यांनी सांगितले. चला हवा येऊ द्या हा कार्यक्रम विनोदी म्हणुन ओळखल्या जातो. ज्यामध्ये निलेश साबळे, भाऊ कदम, सागर करांडे, कुशाल बद्रिके, भारत गणेशपुरे, श्रेया बुगडे आदींचा समावेश आहे. मागच्या दहा वर्षापासुन कार्यक्रम खर्या अर्थाने महाराष्ट्राच्या घराघरात जावुन पोहोचलेला असुन तो पहाण्यासाठी लोकांची गर्दी देखील मोठ्या प्रमाणावर वाढते. झी मराठीच्या चॅनेलवर मोठ्या प्रमाणावर रसिक कार्यक्रम पहातात. विनोदाची जुगलबंदी, मराठी गाण्यातुन विनोदी विडंबन, वेगवेगळ्या वेशभुषेत कलाकारांची तुफान कॉमेडी याचे आकर्षण रसिकांना असते. थुकरटवाडी हा त्यांचा विशेष कार्यक्रम गाजला असुन महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात त्यांचे दौरे असतात. दरम्यान याच दिवशी मराठी पाऊल पढते पुढे बहारदार गीतांचा कार्यक्रम देखील होणार असल्याचेही संयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमाची शहरात जय्यत तयारी सुरू झाली. प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय बंगल्यावर काल पार पडली. त्या बैठकीत कार्यक्रमाची रूपरेषा विविध जबाबदार्या त्यासाठी समित्यांची रचना करून प्रमुख पदाधिकार्यांना वाटप करण्यात आल्या. शहरात सेंट अँन्थोनी शाळेचे भव्य मैदान असुन किमान सहा हजार रसिक बसण्याची व्यवस्था अद्ययावत व्यासपीठ असणार आहे. सांस्कृतिक वारसा तथा साहित्य रसिकांचे माहेरघर म्हणुन ओळखल्या जाणार्या शहरात चला हवा येऊ द्या आणि मराठी पाऊल पढते पुढे दोन भव्य कार्यक्रम होणार असल्याने रसिकांच्या मनात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सद्या तरी कार्यक्रमाची शहरात जोरदार तयारी सुरू असल्याचे लक्षात येते. या मतदारसंघाच्या आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या माध्यमातुन विकासाची गंगोत्री शहरात आणि मतदारसंघात घेवुन येण्यासाठी शासकिय पातळीवर पाठपुरावा करण्यात स्वत: अक्षय मुंदडांचा सिंहाचा वाटा असुन त्यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासात आमुलाग्र बदल झाल्याचे लक्षात येत आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच शहराच्या कानाकोपर्यातील रस्ते दर्जेदार सुमार झाल्याने सर्वत्र लोकांच्या मनातुन मुंदडा कुटुंबियांच्या बाबतीत कौतुकाचा वर्षाव होताना दिसतो. या कार्यक्रमाचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन संजय गंभीरे यांनी केले.



अंबाजोगाई(प्रतिनिधी)

योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी व श्रीमती कमल खुरसाळे न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यात आलेल्या महिला आत्मभान शिबीराच्या समारोप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सहसचिव प्रा. भीमाशंकर शेटे होतेव्यासपीठावर सल्लागार एम.एस.लोमटे, संचालक आर.व्ही. सोनवळकर,एल. जी. वैद्य,ऍड. कल्याणी विर्धे, प्राचार्य एम.व्ही. कानेटकर आदीसह योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. भीमाशंकर शेटे म्हणाले की, जवळपास दोनशे वर्षापूर्वी महिलांची अवस्था वाईट होती

# पाईपलाईन फुटीचे प्रकार थांबवून पाणीपुरवठा सुरळीत करावा ; अश्विन मोगरकर



परळी (प्रतिनिधी)

महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे परळी शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने गणेशपार सह गावभागात आठ दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. वारंवार होणाऱ्या पाईपलाईन फुटीच्या घटना त्वरित थांबवून किमान उन्हाळ्यात तरी पाणीपुरवठा सुरळीत रहावा व पाईपलाईन फोडणार्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी भाजपा पदाधिकारी अश्विन मोगरकर यांनी मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांच्याकडे केली आहे.

परळी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वाण धरणात मुबलक पाणीसाठा असूनही नियोजना अभावी व वारंवार होणाऱ्या पाईपलाईन फुटीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. थर्मल कॉलनी जवळील रस्ते महामार्गाचे काम चालू असलेल्या ठिकाणी हलगर्जीपणामुळे परळी शहराला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटल्याने आठ दिवसांपासून गावभागाला पाणीपुरवठा बंद आहे. यापूर्वीही अनेकवेळा विविध ठिकाणी पाईपलाईन फुटल्याच्या घटना घडल्याने नागरिकांना नाहक त्रास होत आहे. याबाबतीत अश्विन मोगरकर यांनी प्रशासनाकडे तक्रार करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. मुख्याधिकारी यांनी त्वरित दखल घेत ईटके कॉर्नर येथे पाईपलाईन दुरुस्ती ठिकाणी येऊन कामाची पहाणी करून त्वरित दुरुस्ती संदर्भात आदेश दिले. पाईपलाईन दुरुस्तीचे काम पूर्ण करून गावभागात पाणी येईल असे पाणीपुरवठा अभियंता साळवे यांनी सांगितले. वारंवार पाईपलाईन फुटण्याच्या घटनेत वाढ होत असल्याने नागरिकांना कृत्रिम पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याने यावर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी भाजपा पदाधिकारी अश्विन मोगरकर यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

# जिवाचीवाडी येथे कॉमन सर्विस सेंटरचे उद्घाटन संपन्न

केज/प्रतिनिधी

दि.०७ मे २०२५ केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथे केंद्रिय योजनेतुन नाबार्डच्या पुढाकाराने प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारीसंस्थेचे संगणकीकरण प्रकल्पा अंतर्गत महाराष्ट्र शासनाने सहकार खात्या मधुन संगणका चा पूर्ण संच सेवा सहकारी सोसायटी जिवाचीवाडी यांना मिळताच संस्थेने कॉमन सर्विस सेंटरचे उद्घाटन थाटात संपन्न झाले.बीड जिल्हा उप निबंधक सहकारीसंस्था महादेव शिंदे यांच्या आदेशा वरून केज सहकारी संस्थाचे सहाय्यक निबंधक महादेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज कार्यालयीन अधीक्षक श्रीमती माल्टी वहावळे यांच्या शुभहस्ते आणि संस्थेचे सहाय्यक सहकारी अधिकारी कोंडीबा मुंडे यांच्या समवेत कार्यक्रम संपन्न झाला.प्रथमता मान्यवरांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोसायटीचे सदस्य सत्यनारायण चौरे यांनी करताना सांगीतले की, केज तालुक्यातील पहिली संस्था जिवाची वाडीची आहे की कॉमन सर्विस सेंटर चालु करून ग्रामस्थांना अल्पशा अत्यंत कमी दरात ऑनलाईनची कामे करून व विविध दाखले,प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याचा मानस संस्थेचा असुन सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, बालाप्रसाद श्रीरंगदास भुतडा यांनी विशेष उल्लेखनीय कार्य करत केज तालुक्यात विशिष्ट वेगळा उपक्रम राबऊन शेतकऱ्यांचा आर्थीक भार कमी केल्याने ग्रामस्थ व तालुका परीसरात चर्चा होत आहे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोसायटी चे




जेष्ठ संचालक तुळशीराम तोंडे होते. कार्यक्रमास संजय कुटे,दिपक काळे, गोकुळ सारूक,राजेंद्र तांदळे,सुभाष सारूक, चांगदेव चौरे,संगणक चालक नितीन फुंदे, युवराज चौरे इत्यादी ग्रामस्त मोठया संख्येने उपस्थित होते.

१)कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी संस्थेचे सचिव सुरेश बोराडेअनुपस्थित दिसुन आले.२)केज तालुक्यात कॉमन सर्विस सेंटर चालु करणारे जिवाचीवाडी गाव प्रथम आहे.३)सेवा सहकारी सोसायटीने भुतडा यांच्या वाडयात उडउ सेंटर चालु केल्याने ग्रामस्थांना माजी जि.प. सदस्य स्व.श्रीरंगदास भुतडा यांची आठवण आली. ४)जीवाची वाडी संस्थेस संगणक प्रस्ताव व त्याचा पाठपुरावा तत्कालीन अधिकारी, गंगाधर कुटे यांनी केल्याने ग्रामस्थांनी कुटे यांचे मानले आभार मानले.आमच्या प्रतिनिधीने जिल्हा उपनिबंधक समृद्ध जाधव यांच्याशी भ्रम्हणध्वनी वरून संपर्क साधला असता जिल्ह्यात पाच ते सहा ठिकाणी सीएससी सेंटर चालू केलेले आहेत. बाकी ठिकाणी जागेची व विजेची अडचण असल्याचे सांगितले जात आहे.

आमच्या प्रतिनिधीने जीवाची वाडी सेवा सहकारी सोसायटीचे सचिव सुरेश बोराडे अनुपस्थिती बाबत कार्यालयाशी भ्रम्हणध्वनीवरून संपर्क साधला फोन घेतला नाही.वरीष्ठास विचारणा केली,चौकशी करून सबंधीतास पत्र काढले जाईल. महादेव शिंदे,सहायक निबंधक सहकारी संस्था,केज

# सप्तरंगने पाटोदा येथील जामिया इस्लामिया बहरुल उलूम मदरश्याला चार कंप्युटर दिले

## धार्मिक शिक्षणा सोबतच तंत्रज्ञानाचे शिक्षण गरजेचे - अरबाज पठाण

पाटोदा (प्रतिनधी ) पाटोदा येथे दिनांक ७ में वार बुधवार रोजी बीड जिल्हातील सामाजिक कामात अग्रेसर असणारे सप्तरंग सामाजिक प्रतिष्ठाण बीड जिल्हा च्या वतीने सामाजिक दायित्व उराशी बाळगून मुस्लिम मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. याच उदात्त हेतूने सप्तरंग प्रतिष्ठान च्या वतीने पाटोदा येथील जामीया इस्लामिया बहरुल उलुम पाटोदा येथील विद्यार्थी करिता पाच संगणक देण्यात आले. यावेळी सप्तरंगचे संस्थापक अध्यक्ष अरबाज पठाण यांनी मुस्लिम विद्यार्थी दिन सोबत तंत्रज्ञान शिकताना आम्हाला पाहायचा आहे असे म्हटले. स्पर्धेच्या युगात मुस्लिम युवक टिकला पाहिजे राष्ट्र आणि समाजाची सेवा करताना तो सिद्ध झाला पाहिजे यासाठी सप्तरंग शिक्षण क्षेत्रात भरीव काम करेल असे अध्यक्ष म्हणून विश्वास दिला यावेळी दावत ए तब्लिग पाटोदाचे अमानुल्लाह साहब यांच्या हस्ते सदरील संगणक देण्यात आले.



अरबाज सारख्या नेतृत्वाची गरज - अमानुल्लाह साहब

आज मुस्लिम युवकांना दिशा देण्याची गरज आहे योग्य दिशा मिळाली नाही तर युवक व्यसन हिंसा आणि वाईट सवयित अडकतो. मात्र ज्यांना काळाच्या खुणा कळतात युवकांना दिशा देण्याची भूमिका आहे ज्यांना प्रशासनातलं ज्ञान आहे असे नेतृत्व समाजाला पुढे घेऊन जाऊशकते. अरबाज पठाण हे नेतृत्व मुस्लिमांना गरजेचे आहे. दिन आणि तालीम या दोन्ही गोष्टी आमच्या साठी महत्वाच्या आहेत. स्पर्धेच्या युगात मुस्लिम युवक मागे राहू नये या साठी तंत्रज्ञान गरजचे आहे आणि सप्तरंग प्रतिष्ठान कडून ते तंत्रज्ञान मदरशात आले आहे. अल्लाह ने दिलेली हिदायत पुण्यवान असल्याचे त्यांनी म्हटले.

सप्तरंग,सेवाभावी युवकांची नवी सदर

अरबाज पठाण यांनी दिल्लीत मुंबईत काम केले आहे अनेक संस्था नेते यांच्याशी संपर्क असल्याने बीडच्या युवकांना मोठी मदत करण्याची सर्वकष क्षमता असल्याने बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात अरबाज यांच्या सोबत करत्या . सुधारकांची फळी उभा राहिली आहे. यामुळे विधायक आणि रचनात्मक कार्यक्रम हाती घेऊन सप्तरंग म्हणजे सेवा करणाऱ्या पोरांची मोठी सदर म्हणून पुढे येते आहे.यावेळी पाटोदा नगरपंचायत चे नगसेवक आसेफ सेठ सौदागर अरबाज पठाण,अलीम सय्यद,अजमेर मणियार,रफिक पटेल, अस्लम कुरेशी, मुस्तकीम शेख,अफजल सय्यद,अजीम शेख,वसीम मणियार, अमन शेख,साजेद पाशा,शौकत पटेल,अजीज शेख,इम्रान पटेल नदीम शेख,सर्फराज शेख, या वेळी मुफ्ती जफर साहब यांनी सर्वांचे आभार मानले या वेळी मौलाना मोईज . मौलाना मजहर मौलाना आरबाज मौलाना जहूर पठाण चांद खान हुसैन खान तसेच सलीम सर तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली खाली मराठी विषयाचे शिक्षक अमजद खान पठाण इंग्रजी गणित विषयाचे शिक्षक प्रा. सचिन गायकवाड सर अमजद खान पठाण हजर होते .

## वैशाख शु. एकादशी

संकलन :- प्रशांत बाफना

मोहिनी एकादशी

या दिवशीचा व्रताचार अन्य एकादशीप्रमाणेच आहे. या एकादशीचे नाव ' मोहिनी एकादशी ' असे आहे. या व्रताने मोहजाल व पापसमूह दूर जातात. भगवान रामचंद्रानी हे व्रत सीताशुध्दीसाठी केले होते. तसेच, कौंडिण्याच्या सांगण्याने धृष्टबुद्धीने व श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून ते युधिष्ठिराने केले. आजही सनातन धर्मनिष्ट लोक हे व्रत अत्यंत श्रध्देने करतात. या बद्दलची एक कथा आहे, त्यावरून मनुष्याचे वाईट संगतीने पतन व सुसंगतीने उद्धरण कसे होते हे समजते.या दिवशी उपवास , विष्णूपूजा , जाग्रण इ. गोष्टी केल्याने विष्णूलोक मिळतो असे सांगितले जाते.

कथा

युधिष्ठिराने विचारले, 'जनार्दना, वैशाख शुक्ल पक्षातील एकादशीचे नाव काय? त्या एकादशीच्या व्रताचा विधी कोणता व त्या व्रताचे काय फळ मिळते ते मला सांग.'श्रीकृष्ण म्हणाले, 'धर्मराजा, पूर्वी रामाने वसिष्ठ ऋषींना हाच प्रश्न विचारला होता, त्यावेळी वसिष्ठ ऋषींनी रामाला जी कथा सांगितली तीच मी तुला सांगतो. ऐक तर.'रामचंद्र म्हणाला, 'हे भगवंता, सर्व व्रतात उत्तम व्रत कोणते आहे ? हे ऐकण्याची माझी इच्छा आहे. ते व्रत सर्व पापांचा क्षय करणारे व सर्व दुःखांचे निर्मूलन करणारे असावे. हे महामुनी, सीताविरहातून उत्पन्न झालेली अनेक दुःखे मी भोगली आहेत. त्या दुःखांच्या भीतीनेच मी तुला हे विचारीत आहे.'

वसिष्ठ ऋषी म्हणाले, 'रामचंद्रा, तू चांगले विचारलेस. तुझी बुद्धी निष्ठावान आहे. रामचंद्रा, तूझ्या केवळ नामस्मरणानेही मनुष्य पवित्र होतो. तरीपण सर्व लोकांच्या हितासाठी पावन करणारे, सर्व व्रतात पवित्र आणि सर्वोत्तम असे व्रत मी तुला सांगतो. वैशाख महिन्याच्या शुद्ध पक्षातील एकादशीचे नाव मोहिनी एकादशी असे आहे. ही एकादशी सर्व पापांचा नाश करणारी आहे. या एकादशीच्या व्रतप्रभावाने मनुष्य मोहजालातून आणि पातकांच्या समुदायातून मुक्त होतो. हे मी तुला अगदी खरे खरे सांगतो. म्हणून रामा, तुझ्यासारख्यांनी ही एकादशी अवश्य केली पाहिजे. रामचंद्रा, या एकादशीची कल्याणकारक व पुण्यप्रद कथा मी सांगतो ती ऐक. केवळ ही कथा ऐकल्यानेही महापातकांचा नाश होतो.

सरस्वती नदीच्या रम्य किनार्यावर भद्रावती नावाची एक उत्तम नगरी होती. तेथे द्युतिमान नावाचा राजा राज्य करीत होता. तो चंद्रवंशात उत्पन्न झालेला असून धैर्यवान होता. तो युद्धही न्यायानेच करीत असे.त्याच नगरात धनपाल नावाचा वाणी राहत होता. तो धन-धान्यांनी समृद्ध होता. आणि पुण्यकर्मे करणारा होता. त्या वाण्याने पाणपोई, अन्नसत्रे, देवालये, धर्मशाळा, सरोवरे वगैरे बांधली होती. तो शांत स्वभावाचा असून विष्णुभक्तीत तत्पर होता. त्याला पाच पुत्र होते. सुमना, द्युतिमान, मेधावी, सकृती व धृष्टबुद्धी अशी त्यांची नावे होती.

यांपैकी पाचवा धृष्टबुद्धी नित्य महापातके करण्यात मग्न असे. तो नेहमी वेश्येच्या संगतीत असे. विटाच्या गप्पागोष्टीत तो चतुर होता. द्यूत वगैरे व्यसनात तो बुडालेला होता. व परस्त्रियांशी विलास करण्याची त्याला लालसा होती. त्याने देव, अतिथी, पितर, ब्राह्मण यांची कधीही सेवा केली नाही. तो नित्य अन्याय करीत असे. तो दुष्टबुद्धीचा होता व पित्याचे द्रव्य उधळणारा होता. तो पापी अभक्ष्यभक्षण करी आणि नित्य मद्यपानात मग्न असे. वेश्येच्या गळ्यात हात घालून डोळे फिरवीत तो भरचौकात उभा राही.

यामुळे त्याला त्याच्या पित्याने घरातून बाहेर काढले. नातेवाइकांनीही त्याचा त्याग केला. स्वतःच्या देहाखेरीज त्याचे सर्व अलंकार नष्ट झाले. त्याच्याजवळचे द्रव्य संपल्यावर वेश्यांनी त्याचा त्याग केला व निंदा केली. त्यानंतर पुढे त्याच्या अंगावर वस्त्रही राहिले नाही. भुकेने तो व्याकुळ झाला. आता मी काय करू? कोठे जाऊ? कोणत्या उपायाने उपजीविका चालवू? अशी चिंता तो करू लागला.

पुढे त्याने त्या नगरातच चोर्या करणे सुरू केले. तेव्हा त्याला राजपुरुषांनी पकडले. पण त्याच्या पित्याच्या कीर्तीमुळे सोडून दिले. नंतर पुन्हा पकडले व सोडले असे अनेकदा झाले.पण शेवटी राजसेवकांनी त्या दुराचारी धृष्टबुद्धीला बळकट बेड्या घातल्या, चाबकाचे फटके पुन्हा पुन्हा मारले. शेवती राजाने त्याला आज्ञा केली की, 'अरे मूर्खा, तू आता माझ्या राज्यात राहू नकोस ! असे सांगून राजाने त्याला कारागृहातून मुक्त करून हाकलून दिले.

राजाच्या भीतीने तो गहनवनात निघून गेला. तेथे तो भुकेने व तहानेने व्याकुळ होऊन भक्ष्य मिळवण्यासाठी इकडे तिकडे धावू लागला. तेथे एखाद्या सिंहाप्रमाणे तो हरिण, डुक्कर व चितळ यांची शिकार करू लागला. मांसाहार मिळवण्याकरता पाठीवर भाता बांधून व धनुष्यावर बाण चढवून तो सर्व वनात फिरत असे तो अरण्यातील पशुपक्षी मारू लागला. चकोर, मयूर, कंक, तित्तिर वगैरे पक्षी व उंदीर यांची हत्या तो अरण्यात फिरून करीत असे. याप्रमाणे पूर्वजन्मी केलेल्या पापाचे फळ म्हणून तो तेथे दुःखरूपी चिखलात बुडून गेला. त्याचे मन नेहमी दुःखाने व शोकाने भरून गेलेले असे. रात्रंदिवस त्याला चिंता जाळीत असे.

परंतु त्याचे पूर्वजन्मीचे थोडेसे पुण्य शिल्लक राहिले होते ! त्या पुण्यामुळेच की काय एकदा तो कौंडिण्य ऋषींच्या आश्रमात येऊन पोचला. तेथे तपोधन कौंडिण्य ऋषी वैशाख मासानिमित्त भागीरथीत स्नान करून नुकताच आला होता. शोकभावनेने भरून गेलेला धृष्टबुद्धी त्या ऋषीसमोर गेला. इतक्यात कौंडिण्याच्या अंगावरील स्नानाने भिजलेल्या वस्त्रामधून गंगाजलाचा एक बिंदू धृष्टबुद्धीच्या अंगावर पडला. त्या बिंदूचा स्पर्श होताच त्याची सर्व पातके नष्ट झाली व दुर्भाग्य संपले.

धृष्टबुद्धी हात जोडून कौंडिण्य ऋषीसमोर उभा राहिला आणि म्हणाला, 'हे ब्राह्मणश्रेष्ठा, मी जन्मापासून पापच करीत आलो आहे ! द्रव्य खर्च केल्याशिवाय या पापाचे प्रायश्चित्त करता येत असल्यास मला सांगा. कारण सध्या माझ्याजवळ द्रव्य नाही.'ऋषी म्हणाला, 'तुझ्या पापाचा क्षय होण्यासाठी मी तुला गंगानदीत पिंडदान केल्याचे पुण्य व्रत सांगतो, ते एकाग्र चित्ताने ऐक. वैशाख महिन्याच्या शुद्ध पक्षात मोहिनी नावाची एकादशी आहे. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवून तू या एकादशीचे व्रत कर. या एकादशीला उपवास केल्यास ती एकादशी उपवास करणाराची, अनेक जन्मात संपादन केलेली मेरूपर्वताएवढी पापेही नष्ट करते.'

ऋषीचे हे बोलणे ऐकून धृष्टबुद्धी प्रसन्न झाला. रामचंद्रा त्याने कौंडिण्याच्या उपदेशाप्रमाणे विधिपूर्वक व्रत केले. व्रत केल्याबरोबर त्याची पापे संपली. त्याला दिव्य देह प्राप्त झाला आणि तो गरुडावर बसून जेथे कसलेच उपद्रव होत नाहीत, अशा वैकुंठ लोकाला गेला.

रामचंद्रा, अज्ञान व दुःख नाहीसे करणारे असे हे मोहिनी एकादशीचे व्रत आहे. या त्रैलोक्यातील चराचर सृष्टीत या व्रताहून श्रेष्ठ असलेले दुसरे व्रत नाही. या व्रतापुढे यज्ञकर्म, दान किंवा तीर्थे यांचे पुण्य सोळावा हिस्सा सुद्धा भरत नाही. या एकादशीचे माहात्म्य वाचल्याने किंवा ऐकल्याने हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळते.

।।श्रीकूर्मपुराणातील मोहिनी एकादशीचे माहात्म्य संपूर्ण झाले।।

।।श्रीकृष्णार्पणमस्तु।।

## धारूर ग्रामीण रुग्णालय हे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करण्यासाठी प्रयत्नशील - आ. प्रकाशदादा सोळंके

किल्लेधारुर / प्रतिनिधी

धारूर ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर १०० खटांचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतरीत करण्यासह ट्रामा केअर सुरु करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी डायलेसिस व कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी केले.




येथील ग्रामीण रुग्णालयात बिन टाक्याची कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर, डायलेसिस सेंटर व महात्मा फुले आरोग्य सेवा केंद्राचे उद्घाटन आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते मंगळवार दि.६ रोजी करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक संजय राऊत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले जनआरोग्य सेवा केंद्र, डायलेसिस सेंटरची फित कापुन उद्घाटन करुन झाली. यावेळी बोलताना आ. सोळंके यांनी मतदारसंघातील गोरगरीब जनतेला जलद व चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा मिळावी यासाठी माजलगाव येथे स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, वडवणी येथे ग्रामीण रुग्णालय, धारुर तालुक्यातील तेलगाव येथे ट्रामा केअर युनिट व ग्रामीण रुग्णालय उभारल्याचे सांगितले. याच धर्तीवर धारुर ग्रामीण रुग्णालयालाही उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळवून १०० खाटांचे रुग्णालय व ट्रामा केअर युनिट सुरु करण्यासाठी शासन दरबारी प्रस्ताव दाखल केल्याचे सांगितले. जिल्ह्यात एकमेव असलेल्या डायलेसिस सेंटरच्या माध्यमातून येथील वैद्यकीय अधिकारीच नव्हे तर कर्मचाऱ्यांनीही रुग्णाना चांगली व दर्जेदार आरोग्य सेवा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक संजय राऊत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सय्यद शाकेर, तालुकाध्यक्ष आमोल जगताप, शहराध्यक्ष नितिन शिनगारे, माजी नगरसेवक शेख फसियोद्दीन, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहाजी लोमटे यांच्यासह आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उत्कृष्ट सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आ. सोळंके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक वैद्यकीय अधिक्षक डॉ. परदेशी यांनी सुत्र संचालन ड. परमेश्वर शिनगारे यांनी तर आभार डॉ. शेख परवेज यांनी मानले.

## अपघातग्रस्तांना मदत करणे ही आपली नैतिक जबाबदारी

आजच्या धावपळीच्या युगात, आपण सर्वजण वेळेच्या एका कठोर चौकटीत अडकलेले आहोत. प्रत्येकालाच कुठे तरी पोहोचायचं आहे, काही तरी साध्य करायचं आहे. अशा वेळी रस्त्याने प्रवास करताना जर कुठे एखादा अपघात झालेला दिसला, तर बऱ्याच वेळा आपण केवळ पाहतो आणि पुढे निघून जातो. अपघातग्रस्त व्यक्ती मदतीसाठी हाका मारत असते, रक्ताच्या थारोळ्यात असते, श्वासोच्छ्वासासाठी धडपडत असते पण आपण मात्र आपल्या घाईच्या कारणावर ठाम राहून मदत करण्याचे टाळतो. खरं पाहिलं तर ही परिस्थिती अत्यंत दुर्दैवी आणि समाजासाठी चिंताजनक आहे.

कारण आपल्या देशात अपघाताचे भयावह वास्तव आहे,भारतात दरवर्षी लाखो अपघात होतात. सरकारी आकडेवारीनुसार दर तासाला किमान १५ ते २० अपघात होतात, आणि त्यात अनेकजण आपला जीव गमावतात. यामध्ये बऱ्याच वेळा वेळेत मदत न मिळाल्यामुळे अपघातग्रस्ताचा मृत्यू देखील होतो. गोल्डन अवर नावाची संकल्पना वैद्यकीय क्षेत्रात ओळखली जाते, अपघात झाल्यानंतरचा पहिला एक तास अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात जर अपघातग्रस्ताला तात्काळ प्राथमिक उपचार आणि रुग्णालयात दाखल केले गेले, तर त्याचा जीव वाचण्याची शक्यता अधिक असते. पण अनेक वेळा याच काळात मदत मिळत नाही आणि निष्पापास प्राण गमवावे लागतात.ही आजही समाजातील मोठी उदासीनता दिसून येते, जेव्हा आपण रस्त्यावर एखादा अपघात पाहतो, तेव्हा आपली पहिली प्रतिक्रिया असते - हे माझं काम नाही, मला उशीर होईल, पोलीस त्रास देतील, आपण का अडकायचं?. ही मानसिकता आजच्या समाजात खोलवर रुजलेली आहे. काही लोकं तर फक्त मोबाईल काढून व्हिडीओ काढतात, समाजमाध्यमांवर टाकतात, पण प्रत्यक्ष मदतीसाठी पाऊल पुढे टाकत नाहीत. हा स्वार्थी आणि बिनधास्त दृष्टिकोन समाजाला एका गंभीर अधःपतनाच्या दिशेने घेऊन जातो. मात्र अपघातसमयी मदतीसाठी पुढे येणारे काही देवदूतही असतात,सुदैवाने, काही लोकं अशाही काळात माणुसकी जपत मदतीसाठी पुढे येतात. हे लोक खरंच देवदूतच असतात. पोलिस, आरटीओ अधिकारी, रिक्षाचालक, रस्त्यावरील दुकानदार, अगदी सामान्य नागरिकही अनेकदा अपघात पाहताच मदतीसाठी धाव घेतात, रुग्णवाहिका बोलावतात, प्राथमिक उपचार करतात, अपघातग्रस्ताला उचलून हॉस्पिटलमध्ये नेतात. अशा व्यक्तींनी अनेक वेळा अनेकांचे प्राण वाचवले आहेत. शिवाय अपघातसमयी मदत करणाऱ्या अशा मदतगारांना घाबरण्याचे आता कारणही नाही याउलट त्यांना कायद्याने संरक्षण देखील आहे. पूर्वी लोक अपघातग्रस्तांना मदत करायला घाबरत असत कारण त्यांना पोलिसांचा त्रास होईल अशी भीती वाटायची. परंतु सन २०१६ पासून भारत सरकारने गुड समरिटन लॉ लागू केला. यानुसार, जो कोणी एखाद्या अपघातग्रस्ताला मदत करतो, त्याला कोणताही कायदेशीर त्रास दिला जाऊ शकत नाही. त्याला आपली ओळखही उघड करायची गरज नसते. अशा मदत करणाऱ्याला सरकारकडून प्रोत्साहन दिलं जातं. तरीही अनेक लोकांना या कायद्याची माहिती नसल्यामुळे ते मदतीपासून मागे राहतात.

मात्र अपघातग्रस्तांना मदत करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, अपघातग्रस्ताला मदत करणे ही फक्त कायदेशीर किंवा सामाजिक जबाबदारी नसून ती एक नैतिक जबाबदारीही आहे. आज ज्याला मदतीची गरज आहे, तो उद्या आपणही असू शकतो. आपण जर आज मदत केली, तर भविष्यात आपल्यालाही कुणीतरी मदत करेल. जेव्हाही शक्य होईल तेव्हा मदतीचा हात पुढे करा, ही शिकवण प्रत्येकाने मनात रुजवली पाहिजे.तथा अपघात प्रसंगी तात्काळ काय करावे?जर रस्त्यावर एखादा अपघात झाला असेल आणि आपण ते पाहिले, तर खालील गोष्टी तात्काळ कराव्यात. १)सुरक्षिततेची खात्री करा, आपले आणि अपघातग्रस्ताचे संरक्षण महत्त्वाचे आहे.२) रुग्णाची अवस्था पाहा, तो शुद्धीत आहे का, श्वास घेतोय का हे तपासा. ३) तात्काळ १०८ वर कॉल करा, आपत्कालीन (रुग्णवाहिका) सेवेला तत्काळ फोन करा.४) प्राथमिक उपचार करा, आपणास माहिती असल्यास, रक्तस्राव थांबवण्यासाठी प्राथमिक उपचार करा.५) अपघातग्रस्तांचे मनोबल वाढवा,रुग्णाशी बोलून त्याचे मनोबल वाढवा. ६) रुग्णवाहिका येईपर्यंत सोबत रहा,रुग्णाला एकटं सोडू नका. ७) पोलीस मदतीसाठी संपर्क करा,अपघाताची माहिती जवळच्या पोलीस स्टेशनला द्या. यामुळे त्या अपघातग्रस्तांना मोठा आधार मिळून त्यांचे प्राण वाचविण्यास आपली मोठी मदत मिळेल.

सामाजिक जागृतीची गरज

आज समाजात अपघातांबाबत जागृती निर्माण करण्याची नितांत गरज आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, नागरिक मंडळे यांच्यामार्फत जनजागृती केली पाहिजे. रस्ता सुरक्षा सप्ताह, प्राथमिक उपचार कार्यशाळा, गुड समरिटन कायद्याविषयी मार्गदर्शन असे उपक्रम राबवून जनतेमध्ये सजगता निर्माण करणे आवश्यक आहे. दरवर्षी जानेवारी महिन्यात केंद्र आणी राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियानाच्या माध्यमातून आरटीओ व पोलिस अधिकारी यांचे द्वारे विविध शाळा,विद्यालय, महाविद्यालय,आणी चौकाचौकांमध्ये वाहतूक नियमांच्या जनजागृतीपर अपघातांविषयक तथा वाहतूक नियमांची जनजागृती केली जाते,परंतु जनसामान्यांचा त्यास अत्यल्प प्रतिसाद लाभतो ही शोकांतिका आहे. अशा अत्यंत महत्त्वाच्या कार्यक्रमांना केवळ वाहन चालकच नव्हेतर रस्त्यावर पायी चालणारे पादचारी आणी लहानपासून थोरांपर्यंत सर्वांनीच आवर्जून उपस्थिती दर्शविली पाहिजे.

काही प्रसंगसिद्ध उदाहरणे असेही आहेत की,काही घटनांमधून हे ठळकपणे दिसते की एका सामान्य नागरिकाच्या तात्काळ कृतीमुळे एखाद्याचा जीव वाचतो. पुण्यात एकदा एक तरुण दुचाकीवरून जाताना अपघात झाला आणि तो रस्त्याच्या कडेला बेशुद्ध पडला. एक रिक्षाचालक तिथे आला, त्याने कोणताही विचार न करता त्या तरुणाला रुग्णालयात नेले. वेळेत उपचार मिळाल्यामुळे त्याचा जीव वाचला. खरे तर हे रिक्षाचालक समाजाचे खरे हिरो आहेत.

अपघात रोखण्यासाठी आपण काय करू शकतो?

१) वाहन चालवताना वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करणे, वेगावर योग्य नियंत्रण ठेवावे,सिग्नल तोडू नये, हेल्मेट/सीट बेल्टचा वापरा करावा,२) शिस्तीत वाहन चालवा, वेगमर्यादा पाळा, मोबाईलचावापर टाळावा, ३) वाहनाची स्थिती तपासा,ब्रेक, टायर, लाईट्स यांची वेळोवेळी तपासणी करा.,४) रस्ता सुरक्षिततेबाबत इतरांना जागरूक करा.झोप येत असेल अथवा थकवा जाणवण असेल तर वाहन चालवू नये, योग्य आणी सुरक्षित जागा बघून थोडीशी विश्रांती घ्यावी,मगच वाहन चालवावे,वाहन चालवताना नेहमी स्वतःचा बचाव यासोबतच समोरच्याचा देखील बचाव करणे तीतकेच महत्त्वाचे असते.

माणुसकी हाच खरा धर्म आहे ही आपली भारतीय संस्कृती शिकवते. एखादा अपघातग्रस्त रस्त्यावर मदतीसाठी धडपडतो आणि आपण फक्त पाहत पुढे जातो, तर आपण एका माणसाला वाचवण्याची संधी गमावतो. आपले काही मिनिटे थांबणे, एक फोन करणे किंवा रुग्णवाहिकेची मदत मिळवून देणे,एवढंच केल्याने एखादा जीव वाचू शकतो.म्हणूनच, पुढच्या वेळी जेव्हा आपण रस्त्यावर एखादा अपघात पाहू, तेव्हा 'मी का मदत करावी?' असं न विचारता, 'जर मी नाही मदत केली तर कोण करेल?' असा विचार करूया. समाजात आपले योगदान हे अशा छोट्या पण प्रभावी कृतींमधूनच घडते.एकटे आपण संपूर्ण जग बदलू शकत नाही, पण कुणाच्यातरी संपूर्ण जगासाठी आपण फरक नक्कीच घडवू शकतो

प्रशांत बाफना /अहिल्या नगर जिल्हा प्रतिनिधी
८०५५४४०३८५